वर्ष : सोळावे
सप्टेंबर २०२४
अंक : नववा
मूल्य २० रुपये
पृष्ठसंख्या ५६

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ




पं. जितेंद्र अभिषेकी यांची
शिष्य, मैफलगायक, संगीतकार आणि गुरू ही संगीतविश्वातील चार रूपं.
अशा या प्रतिभावान, चतुरस्र कलाकाराच्या
व्यक्तिमत्त्वाचा अन् संगीतकर्तृत्वाचा वेध घेणारा चरित्रग्रंथ.

एका लांबलेल्या आत्महत्येचा प्रवास. चाळिशीतील जोडप्याच्या वैवाहिक जीवनातील वैचारिक विसंवादाची जीवघेणी आंदोलने. हे काही अवखळ करमणुकीचे नाटक नाही.
सध्याच्या जगण्यातील विखंडतेवर हे नाटक सतत
भाष्य करते. जगण्यातील अपरिहार्यता,
स्त्री-पुरुष लग्नसंबंधांची सार्थकता,
अर्थपूर्णता आणि कालौघातील निरर्थकता,
त्यातील भाव-विषता यांच्या रंगमंचीय खेळाचे
गारूड नाटक संपल्यावरही आपल्याबरोबर येते.
वरकरणी मस्त चाललेल्या लग्नसंसाराच्या
अंतर्मनाचे हे रंगमंचीय धिंडवडे आहेत.
अशा नाटकाला सुरुवात असते,
पण शेवट असतोच असे नाही.
तो प्रत्येकानी आपापला समजून घ्यायचा असतो.

**सतीश आळेकर**






ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
तृप्ती देशपांडे

वर्ष सोळावे :
अंक नववा
१५ सप्टेंबर २०२४
मूल्य : ₹ २०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *विवाह नाकारताना*
  – मृणालिनी चितळे / ९
- गाऊ त्यांना आरती
  *गगन समुद्री बिंबले...* / १५
- चित्र पाहीन आवडी : नितीन हडप / २३
- असे जन्मले पुस्तक!
  *टगी गँग आणि इतर प्रयोगक्षम नाटिका* – अजित ठोसर / २७
- आठवणींच्या खिडकीतून
  *नाटक : एक अनुभव*
  – माधव वझे / ३१
- क... कवितेचा
  - अतुल सातभाई, विलास फडके / ३५
- उद्गार
  *पाषाणाचे पाझर* - श्रीराम शिधये / ३७
- राजहंसी पार / ४३
- वाचकांच्या मनातलं... / ४८

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९/२४४६५०६३.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




भारताच्या सहा शेजारी देशांतील ठरावीक व्यक्तींना
भारताचे नागरिकत्व ज्या कायद्याने मिळू शकते,
त्या नव्या कायद्याच्या विविध पैलूंचा वेध घेणारे -

### नागरिकत्व दुरुस्ती कायदा

घटनात्मकता व वास्तवता

शेषराव मोरे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

आज परिवर्तनाच्या चळवळी कुंठित झाल्याचे चित्र दिसते.
अशाच शोधरात्रेत राजीव साने केवळ चिकित्सा करून
थांबले नाहीत, तर स्वतंत्र नीतिशास्त्राच्या उभारणीची गरज
त्यांनी ओळखली. भविष्यातील आवश्यक अशा
विचारमंथनाच्या दिशेने जाणाऱ्यांना
मार्गदर्शक ठरेल असे पुस्तक.

### स्फूर्तिवादी नीतिशास्त्र

राजीव साने

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ५०)







'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' यंदापासून अमलात
येतंय, अशा वेळी शिक्षणातल्या सगळ्या घटकांना
पडणाऱ्या प्रश्नांची नेमकी उत्तरं देणारं,
शिक्षणतज्ज्ञांनी लिहिलेलं मोलाचं पुस्तक.

### नवे शैक्षणिक धोरण

विद्यार्थी-पालकांसाठी मार्गदर्शन

प्रा. डॉ. नितीन करमळकर । मंगला गोडबोले

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)



# संपादकीय

*आज ९० वर्षे झाली, तरी स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट यांनी आपल्या मुलांना लिहिलेले पत्र कालबाह्य ठरत नाही; म्हणूनच त्या पत्राच्या अनुषंगाने २०१५ साली लिहिलेले संपादकीय आम्ही पुनर्मुद्रित करत आहोत.*

नमस्कार वाचकहो,

हे पत्र लिहिले जाऊन कित्येक दशके उलटली. पण पत्र आकर्षून घेते. वाचावेसे वाटते. 'विश्रब्ध शारदा' या ग्रंथाने थोरांची आणि थोरांसंबंधीच्या पत्रांचे जे अनेक माणिकमोती जपले आहेत, त्यातच हे पाहायला मिळाले. पत्राची पार्श्वभूमी अशी : १९३०च्या आसपासचा काळ आहे. सोलापूरमध्ये मार्शल लॉच्या काळात ब्रिटिश सैन्याने तेथील नागरिकांवर आत्यंतिक अत्याचार केले. त्यामुळे क्षुब्ध होऊन वासुदेव बळवंत गोगटे या तरुणाने ब्रिटिश शासकीय यंत्रणेचे प्रतिनिधी, मुंबई इलाख्याचे गव्हर्नर हॉटसन यांच्यावर गोळी झाडली. यानंतर रत्नागिरी येथील व्याख्यानात सेनापती बापटांनी सशस्त्र क्रांतीचे समर्थन केले आणि गोगटे यांचे 'भले बहाद्दर' म्हणून कौतुक केले. यावरून सेनापती बापट यांना सात वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. त्या वेळी सेनापती बापट यांनी १७ मार्च १९३४ या दिवशी तुरुंगातून आपल्या वामन आणि कमल या मुलांना लिहिलेले हे पत्र आहे. भोवतालच्या सामाजिक परिस्थितीचे भान असलेल्या एका जागरूक पालकाचे हे पत्र आहे. मुलांनी पुस्तकांचे वाचन-मनन कसे केले पाहिजे, जेणेकरून त्यांची दृष्टी विशाल होईल; यांची जाण असलेल्या विचारवंताचे हे पत्र आहे. यात पित्याचे अंत:करण असले, तरी पत्र कौटुंबिक भावनांमध्ये बुडालेले नाही. संततिनियमनाचे विचार मांडणारे र. धों. कर्वे यांची पुस्तके-लेख आपल्या मुलांपर्यंत पोहोचू शकतात, त्याचा काय परिणाम होऊ शकतो; हे लक्षात घेऊन संतुलित मनाने लिहिलेले हे पत्र आहे.

*अनेक आशीर्वाद*

*वामन, कमल; 'समाजस्वास्थ्यकारां'ची सध्यां फार प्रसिद्धि झाली आहे. तो माझा सहाध्यायी. न्यू स्कूलमध्यें सातव्या इयत्तेंत आम्ही एका डिव्हिजनमध्यें होतों.*

*गणितांत फार हुशार. त्याचा बाप संत कर्वे गणिती, तो गणिती. संत कर्वे ह्यांनीं स्त्रियांकरितां संस्मरणीय काम केलें–करीत आहेत. माझ्या सोबत्याचाहि एक हेतु स्त्रियांना पुरुषांबरोबरीचा हक्क मिळवून देण्याचा दिसतो. तो स्तुत्य हेतु आहे. परंतु जो विषय त्यानें हातीं घेतला आहे, तो महाबिकट व विकट आहे. ब्रह्मचर्याची थट्टा, कामवासनेच्या संयमाची थट्टा, जगाला कर्ता धर्ता कोणी नाहीं, माणूस मेला कीं संपलें; आत्मा टिकतो, पुन्हा देह घेतो वगैरे सब झूट इत्यादि मतें आता त्याला मानवली आहेत. मला ह्या सर्व गोष्टी पाहून परमेश्वराच्या अजब लीलेचें विशेषच कौतुक वाटतें. नास्तिकाचा पार्ट, संशयवाद्यांचा पार्ट, सर्व पार्ट, सर्व सोंगें एकच परमेश्वर घेतो. प्रत्येक जीवाला अनेक अनुभवांतून, अनेक मतमतांतरांतून फिरवून शेवटी अनेक जन्मांतीं आपल्या विश्वनाटकाचें गूज दाखवायचें ही परमेश्वराची योजना आहे इत्यादि गोष्टी मी मानतों. कर्वे स्वत:ची मते तर्कशुद्ध समजतो. मी माझी तर्कशुद्ध समजतो. वाद करीत असावें, संवाद करीत असावें, विचार करीत असावें व खोल विचारांतीं जें ज्या वेळीं योग्य दिसेल तें मानावें, वागावें व व्यवहारात आणावें...*

*तुमच्या हातांत कर्वेचें लिखाण कोणतें कोणतें पडलें आहे किंवा पडणार आहे तें मला ठाऊक नाहीं. कोणाचेंहि लिखाण वाचा, अभ्यासा, मात्र शंकायुक्त मनाने त्याचें परीक्षण करीत चला. उदाहरणार्थ, ब्रह्मचर्य शक्य आहे, संयम चांगला वगैरे मते देणारे डॉक्टर कमी किमतीचे ठरविणें व उलट्या मताचे डॉक्टर 'अधिक श्रद्धेय' ठरविणें इत्यादि गोष्टी कोणी करू लागला म्हणजे त्याचा पुरावा बारकाईनें तपासला पाहिजे. कर्वे याच्या कामशास्त्रातहि काही गोष्टी स्वच्छतेच्या वगैरे उपदेशाच्या चांगल्या आहेत. परंतु त्याचा एकंदर परिणाम तरुण अविचारी मनावर चांगला होण्यासारखा नाहीं. रोमन लोक विलासी झाले त्यायोगें त्यांची जगद्व्यापी बादशाही धुळीस मिळाली. आम्ही धुळीत पडलों आहों. त्यात आणखी स्वैरविलासाचा 'हक्क' बजावू लागलों तर मग उन्नतीची आशा कशाला? कर्वेचे पुस्तक वाचनात आलें असेल तर महात्मा गांधीचें 'संयम की स्वैराचार' हे पुस्तकहि वाचा. प्रत्येक गोष्टीचा तुमच्या डोक्याला करता येईल तितका खोल विचार करा व तो विचार करतांना हृदय, अंत:करण, परहिताच्या भावना लक्षात घेण्यास विसरूं नका. आनंदाची चढती श्रेणी आहे. आनंद हे सामान्य नाव अनेक दर्जांच्या सुखांना लावलें जातें. तुम्ही सध्यां विद्यानंदाचे नाना प्रकार थोडे थोडे अनुभवीत आहां. प्रेमानंद-नि:स्वार्थ लोकहितसाधनार्थ प्रयत्नाचा आनंदहि तुम्ही थोडाबहुत अनुभविला आहे. हे शुद्ध अवीट आनंद आहेत.*

*तात्या*

*(पां.म. बापट कैदी नं. १७८३)*

या पत्रात सेनापती बापट यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू दृष्टीला पडतात. सश्रम कारावासाची काळी उदास छाया पत्रावर पडलेली नाही. थोडक्या शब्दांत बरेचसे सांगून जाणारी ही शैली आहे. १९३४मध्ये वडलांनी स्वत:च्या मुलांशी ब्रह्मचर्य, कामवासना या विषयांवर पत्रातून खुलेपणाने संवाद केला, याची आपल्या सामजिक इतिहासात नोंद घेतली पाहिजे. तुरुंगातून लिहिले गेलेले पत्र हे पूर्ण खाजगी राहूच शकत नव्हते. काही तुरुंगअधिकारी ते वाचणार, हे उघड होते. तरीही सेनापती बापट या विषयावर लिहिताना दचकले नाहीत, हे विशेषच होते. सशस्त्र क्रांतीचे समर्थक असूनही त्यांनी मुलांना अहिंसेचे पुजारी असलेल्या म. गांधींचे विचार वाचण्यास सुचवले होते. यावरून विरोधी विचार ते मन:पूर्वक ऐकू इच्छित होते, असे या पत्रात जाणवते. त्यांनी दिलेले रोमन साम्राज्याचे उदाहरण आणि त्या अनुषंगाने आम्ही तर धुळीतच आहोत मग काय होऊ शकेल; इत्यादी विचारही प्रत्यक्ष व्यवहाराच्या पातळीवर पटण्यासारखे आहेत.

वाचन आणि मनन यांसंबंधी त्यांनी तेव्हा त्यांच्या मुलांना जे लिहिले आहे, ते आजच्या काळातील सर्व वाचकांनाही मार्गदर्शक आहे; यात शंका नाही. म्हणून हे पत्र आजही कालबाह्य वाटत नाही. थोडे पुढे जाऊन असे म्हणता येईल की, हे विचार आज दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांवरील चर्चासत्रांत सहभागी होणाऱ्या व्यक्तींना आणि त्यांच्या प्रेक्षकांनाही मार्गदर्शक आहेत. आज दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांवर आपण ज्या निरनिराळ्या चर्चा ऐकतो, तेव्हा दिसते की, विरोधक एकमेकांचे ऐकण्याच्या मन:स्थितीत नसतात; एकमेकांवर तुटून पडतात. प्रत्येक जण स्वत:चेच घोडे पुढे दामटायला पाहतो. सूत्रचालक त्यांचे नियंत्रण करू शकत नाहीत, कधी कधी ते यात सामील होऊन पक्षपातीपणे बोलू लागतात. याचा दुसरा अर्थ असाही होतो की, बापटांसारख्यांचे विचार समाजमनावर ठसून जे बदल होणे अपेक्षित होते, ती प्रक्रिया झालीच नाही. इतक्या वर्षांत आपण वाचक बदललोच नाही? प्रत्येकाच्या विचारांचा ताठरपणा ही आपली सामाजिक समस्या आहे का?

बापटांची एक मर्यादाही या पत्रात जाणवते. इतके प्रगल्भ असलेले सेनापती बापट स्वत:च्या परमेश्वराच्या खेळाविषयक विचारांना तर्कशुद्ध कसे काय म्हणतात याचे आश्चर्य वाटते. वेगवेगळी सोंगे परमेश्वरच वठवतो असे वाटणे, ही भावनात्मक पातळी आहे. अगदी मनमोकळेपणाने ते या प्रकारे विचार व्यक्त करतात, हे उत्तमच आहे. पण अमूर्त परमेश्वर ही कल्पना तर्कनिष्ठ नाही.

काहीही असो, त्याग आणि पराक्रम यामुळे केवळ वंदनीय आणि दूरच्या वाटणाऱ्या व्यक्ती अशा पत्रांमुळे एकदम जवळच्या तुमच्याआमच्यातल्या वाटू लागतात. अशी पत्रे आपल्या मनाला आधार देतात.

***विनया खडपेकर,*** संपादक राजहंस

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके



माणसात लपलेल्या हिंस्रतेचे
अनेकविध पदर उलगडून दाखवणारा,
त्याच्यातल्या माणूसपणाचेही
दर्शन घडवणारा

### युद्धानंतर...

आदित्य दवणे

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या अनावर ओढीपायी
तीन पिढ्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष
आणि परस्परांना समजून घेण्याचे प्रयास
चित्रित करणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी!

### ज्याचं त्याचं एव्हरेस्ट

मृणालिनी चितळे

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)





आपल्याही नकळत आपल्या रोजच्या जगण्याचा
भाग झालेल्या टीव्ही मालिका.
त्याबद्दल स्वत:ला आणि प्रेक्षकांना पडणाऱ्या
अनेक प्रश्नांची उत्तरं देणारं,
‘मालिका’ या विषयावर मार्गदर्शन करणारं पुस्तक...

### टीव्ही, मालिका आणि बरंच काही...!

मुग्धा गोडबोले

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## विवाह नाकारताना

*संपूर्ण पुस्तक वाचून झाल्यावर मनात ठसते ते विनया यांचे मनस्वी व्यक्तिमत्त्व. 'न-लग्नामुळे' सांसारिक व्यापताप कमी होतात, हा गैरसमज त्यांनी खोडून काढला आहे. पुस्तकात मांडलेले विचार आणि अनुभव हे १९६० ते १९९० या तीन दशकांतील विवाहसंस्थेचा इतिहास आणि दस्तऐवज म्हणून महत्त्वाचे ठरतात.*

'विवाह नाकारताना' हे विनया खडपेकर यांचे आत्मकथन. विवाह ही मध्यवर्ती संकल्पना घेऊन त्या अनुषंगाने त्यांनी आपल्या आठवणी सांगितल्या असल्याचे पुस्तकाच्या शीर्षकातून प्रतीत होते. त्यांचे लेखन आत्मकथनपर असले; तरी त्यांनी ते फक्त स्वत:च्या अनुभवांवर लिहिले नसून, १९६०च्या आसपास स्त्रीच्या विवाहाकडे पाहण्याचा कौटुंबिक आणि सामाजिक दृष्टिकोन, विवाह जुळण्याचे निकष; एखाद्या स्त्रीने लग्न नाकारल्यास तिचे कुटुंब, नातेवाईक आणि तिच्या अवतीभवतीचा समाज यांमध्ये उमटणाऱ्या प्रतिक्रिया, घेतले जाणारे आक्षेप; एकट्या राहणाऱ्या स्त्रीला मदत करण्याच्या मिषाने आलेले भलेबुरे अनुभव यांचे तपशीलवार चित्रण लेखनामध्ये केले आहे.

एका मध्यमवर्गीय, खाऊनपिऊन सुखी असलेल्या कुटुंबात विनया लहानाच्या मोठ्या झाल्या. घरातील वातावरण मनमोकळे होते. पुस्तके, व्याख्याने, नाटके यांवर घरात भरभरून चर्चा व्हायची. या वातावरणामध्ये हळूहळू बदल होत गेला, ते विनया यांच्या लग्नाची बोलणी सुरू झाल्यापासून. विनया यांना लग्न करायचे नव्हते, अशातला भाग नव्हता; परंतु लग्न ठरवण्याच्या पारंपरिक पद्धतीला विरोध होता. आठ-दहा जणांसमोर होणारी वधुपरीक्षा, पत्रिका, मानपान, हुंडा या सव्यापसव्यांत ज्या दोघांना पूर्ण आयुष्य एकत्र जगायचे आहे; त्यांचे विचार आणि भावना जुळत आहेत की नाहीत याकडे होणारे दुर्लक्ष त्यांना पटत नव्हते. एके ठिकाणी लग्न जमवण्यात तरबेज समजल्या जाणाऱ्या एका व्यक्तीचा उल्लेख त्यांनी 'दलाल' असा केला आहे. त्या प्रसंगाविषयी त्या लिहितात, 'मी समोर आल्यावर त्यांनी माझ्याकडे आपादमस्तक पाहिले आणि ते माझ्या वडलांना म्हणाले, ''साहेब, तुम्हाला थैली सैल सोडावी लागणार.'' अपमानाचा जळजळीत लोट माझ्या

तनामनातून गेला.' घरच्यांच्या दबावामुळे लग्न जमवण्याच्या या बाजारी पद्धतीचा चार-दोन वेळा अनुभव घेतल्यानंतर मात्र मुलाला तीन-चार वेळा भेटून परिचयोत्तर विवाह करण्याचे त्यांनी ठरवले. आज ही पद्धत सर्वमान्य झाली असली; तरी १९७०च्या आसपास ती रुळली नव्हती. विनया यांचा आग्रह बघून तसाही प्रयत्न घरच्यांनी केला, पण यश आले नाही.

दरम्यानच्या काळात रिझर्व्ह बँकेत नोकरी मिळाल्याने आर्थिकदृष्ट्या त्या कुणावरही अवलंबून नव्हत्या. लेखनवाचनाची आवड जोपासत मन:पूत आयुष्य जगत होत्या, परंतु आजूबाजूच्या व्यक्ती त्यांच्या कोणत्याही कृतीचा संबंध त्यांच्या अविवाहत्वाशी (यासाठी त्यांनी 'न लग्न' हा सुटसुटीत शब्द निर्माण केला आहे.) जोडत होत्या. याची असंख्य उदाहरणे त्यांनी दिली आहेत. 'तू धीटपणे वाद का घालू शकतेस? तुझं लग्न झालं नाही म्हणून!', 'तू एकदम चार साड्या विकत का घेतल्यास?' वा 'तू इतक्या वस्तूंमधलं काहीच कसं विकत घेतलं नाहीस?' दोन्ही प्रश्नांचे उत्तर एकच 'तुझ्यामागे संसार नाही म्हणून!' एवढेच नाही, तर सोयीचा वाटतो आणि आवडतो म्हणून साडीऐवजी त्यांनी पंजाबी पोशाख केलेला पाहून, 'लग्न झालं नाही तोवर सगळ्या हौशी करून घे.' असा अनाहूत सल्ला दिला गेला किंवा ऑफिस सुटल्यावर व्यायाम म्हणून चर्चगेटपर्यंत चालत जायला सुरुवात केल्यावर, 'तिचं लग्न न झाल्यामुळे तिला फॉर्म टिकवायलाच हवा. आम्हाला काय आता...' अशी टिंगलटवाळी केली गेली. विनया यांचे वय २५ ते ३०च्या दरम्यान असताना अशा टीकाटिपणीमुळे त्या अस्वस्थ व्हायच्या. लोकांच्या कुत्सित नजरेपासून पळ काढायला बघायच्या. ऑफिसमध्ये सगळ्यांबरोबर डबा खाणे त्यांनी बंद करून टाकले. पस्तिशीच्या दरम्यान लोकांच्या फाजील चौकशांना वाक्बाणांनी फटकारण्याइतका धीटपणा त्यांच्यात आला. त्यानंतरच्या वयात समोरच्या नजरेतील प्रश्न जाणवून त्याकडे दुर्लक्ष करण्याचा किंवा कुणी आक्षेपार्ह पद्धतीने जवळीक




ही आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची,
भौगोलिक तसेच मानसिकही. हेतू, साधने
आणि साध्य काहीही असो,
आहे कमालीची आनंददायी आणि चिंतनगर्भ.

आनंदाच्या दाही दिशा

एक मुक्त प्रवास

डॉ. आरती रानडे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

साधण्याचा प्रयत्न केला, तर त्याला वेळीच त्याची जागा दाखवून देण्याचा सूज्ञपणा त्यांच्यात आला.

हा प्रवास सोपा नव्हता; परंतु वाचनलेखन, सामाजिक क्षेत्रातील कार्य यामुळे आलेली प्रगल्भता आणि स्पष्टवक्तेपणा यामुळे हा प्रवास त्या यशस्वीपणे करू शकल्या. या प्रवासात त्यांच्याही आयुष्यात मोहात पडावे असे हळवे क्षण आले. परंतु प्रत्येक वेळी त्या मागे फिरल्या. त्यांच्यावर झालेले संस्कार, समोरच्या व्यक्तीच्या पत्नीचा आलेला विचार, किंवा स्वभावाचा भाग अशी काही कारणे त्यामागे होती. ते अनुभव आणि त्यांच्या कृतीचा अर्थ यांचा मागोवा त्यांनी अत्यंत प्रांजळपणे घेतला आहे. आत्मपर लेखनात ही गोष्ट आवश्यक ठरते, परंतु अनेक वेळा सोयीस्कर तेवढेच सांगितले जाते. अनेक वेळा आपल्या कृतीला उदात्त हेतू चिकटवला जातो किंवा पळवाट शोधली जाते. विनया यांनी मात्र भावनिक आणि शारीरिक पातळीवर त्या जशा जगल्या, ते सर्व जसेच्या तसे कागदावर उतरवले आहे. त्या नाजूक प्रसंगाविषयी त्या लिहितात, 'माझ्या स्वभावामुळे धोक्याच्या दऱ्या टळल्या, तशीच आनंदाची शिखरेही निसटली. पण स्व-भाव नाही सोडता येत.' स्त्रीवादी गटातील चर्चांमुळे त्या स्वतःच्या आत डोकावू शकल्या. त्यांना निश्चितपणे कळले की, 'त्यांच्यात आसुसलेली आई नव्हती. समर्पित पत्नी/प्रेयसी नव्हती. पण उत्कट प्रणयिनी होती. उत्सुक सखी होती. ती वंचितच राहिली.' पारंपरिक विवाहपद्धतीमुळे किती जणांवर अन्याय होतो, आपल्या नैसर्गिक भावनांचा कोंडमारा सहन करावा लागतो याचे अत्यंत धीटपणे केलेले हे आत्मपरीक्षण आहे.

या पुस्तकाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे कुटुंबातील नातेसंबंध आणि ताणतणाव यांचा अनेक अंगांनी घेतलेला परामर्श. त्यांची आई प्रगत विचारांची स्त्री होती. बायकांचे लाजणे, एवढ्याशा कारणासाठी मुळुमुळु रडणे यावर त्या नेहमी टीका करायच्या. १९५८/५९च्या काळात नगरसारख्या लहान गावात स्वतः नऊवार

निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार, मानवी स्वभावातील अतर्क्य भावनाट्य किंवा जीवनाच्या एखाद्या प्राणसूत्राचं स्वतःला निःसंदर्भ होऊन करून केलेलं आत्मचिंतन. एखाद्या संवेदनशील स्त्रीनं आपल्या जाणत्या सखीला कधी मनोगत तर कधी हृद्गत सांगावं, तसा आशय सांगणारा लेखसंग्रह...

गोंदणखुणा

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)



साडी नेसून त्या इतर बायकांना पोहायला शिकवायच्या. त्या काळात स्विमिंग सूट घालून पोहण्यासाठी आईने विनयाना प्रोत्साहन दिले होते. मुलींनी शिकावे, वेगवेगळ्या क्षेत्रांत पुढे जावे, यासाठी धडपडणारी त्यांची आई मुलीचे लग्न जुळावे यासाठी मात्र अगतिक होऊन गेलेली विनया यांनी पाहिली. अनेक गोष्टींमध्ये दोघींचे खटके उडायला लागले. आईमुलीच्या नात्यातील रुसवेफुगवे, कधी नको इतके गृहीत धरणे, अहंकाराची सीमा गाठणे, तर कधी मायेने समजून घेणे... अशा विविध छटा त्यांनी उलगडून दाखवल्या आहेत. त्यांचे वडील आणि विशेषत: मोठा भाऊ अप्पा यांच्याशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे नाते होते. अप्पाशी विविध विषयांवर चर्चा करताना बहीणभावाच्या नात्यातील समरसता त्यांनी अनुभवली होती. त्याच अप्पाचे वयोपरत्वे तुटक वागणेबोलणे त्यांना दुखावून गेले. बहीण साधना, मेहुणा सुहास बहुळकर आणि जिवाभावाच्या मैत्रिणी यांची धावती व्यक्तिचित्रे त्यांनी रेखाटली आहेत आणि बालिशपणे वागून कागाळ्या करत राहणारी वहिनी वा न-लग्नावरून अपमान करणारी प्रतिष्ठित लेखिका यांचे उल्लेख न कचरता केले आहेत. 'उगाच कशाला वाईटपणा घ्या' हा बोटचेपेपणा त्यांनी केलेला नाही. त्यामागे 'गावगप्पा' हा उद्देश नसून माणसाचे स्वभावविभाव टिपण्याचा आणि त्यातील संगतीविसंगतीवर नेमकेपणी बोट ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. लेखनाच्या क्षेत्रात त्यांच्या 'ज्ञात-अज्ञात अहिल्याबाई होळकर' या चरित्राला मिळालेले पुरस्कार आणि लोकप्रियता यांचा उल्लेख त्यांनी ज्या संयमित पद्धतीने केला आहे, त्याच पद्धतीने 'निवडक माणूस' या ग्रंथामध्ये त्यांनी घेतलेल्या माधवराव काणे यांच्या मुलाखतीला स्थान मिळाले नाही याविषयीचा उद्वेगही.

बँकेतील कारकुनी कामाचा मनापासून कंटाळा आल्यामुळे स्वेच्छानिवृत्तीचा निर्णय त्यांनी घेतला. त्यापायी होणाऱ्या आर्थिक नुकसानापेक्षा लेखनवाचन, समाजकारण या आवडीच्या क्षेत्रात काम करत राहण्याचे मोल त्यांना अधिक वाटले. निवृत्तीनंतर राजहंस प्रकाशनाच्या संपादन क्षेत्रात त्या मनापासून रमल्या. सामाजिक क्षेत्रात काम




महाराष्ट्राच्या कोपऱ्यातल्या खेड्यातली मुलगी इंदूरच्या सुभेदार होळकरांची सून झाली. अठराव्या शतकातल्या मराठा साम्राज्याचा आधारस्तंभ ठरली. ती सत्ताधारी होती, पण ती सिंहासनावर नव्हती. ती राजकारणी होती, पण ती सत्तेच्या चढाओढीत नव्हती. तिचे चरित्र...

ज्ञात-अज्ञात **अहिल्याबाई होळकर**

विनया खडपेकर

आवृत्ती सातवी । किंमत : ₹ ३७०/- । (ट.ख. ₹ ५०)

करताना डाव्याउजव्या दोन्ही विचारप्रणालींतील ज्यांचे विचार त्यांना पटले, आवडले; त्यांच्याबरोबर विनया यांनी मन:पूर्वक काम केले. जिथे पटण्यासारखे नाही हे लक्षात आले, तिथेतिथे कुणाशीच शत्रुत्व न घेता त्या कामातून बाजूला झाल्या; पण तेथील मैत्रिणींशी जुळलेले नाते मात्र गढूळ होऊ दिले नाही.

आईवडलांच्या उतारवयात आणि भावाच्या आजारपणात सर्व जबाबदाऱ्या समर्थपणे पेलून त्यांनी 'न-लग्नामुळे' सांसारिक व्यापताप कमी होतात, हा गैरसमज खोडून काढला आहे. घरातल्यांच्या अपेक्षा पूर्ण करताना त्यांनी कधी कष्टांची फिकीर केली नाही आणि कामात चालढकल केली नाही. यातून एक गोष्ट निर्विवादपणे सिद्ध होते की सांसारिक जबाबदारी घेणे वा टाळणे याचा संबंध एखाद्याने लग्न केले की नाही याच्यावर अवलंबून नसतो, तर तुमच्यातील सदसद्विवेकबुद्धीशी आणि संवेदनशील वृत्तीशी असतो. ही वस्तुस्थिती अनेक प्रसंगांतून अधोरेखित होत जाते. संपूर्ण पुस्तक वाचून झाल्यावर मनात ठसते ते विनया यांचे मनस्वी व्यक्तिमत्त्व आणि त्या बरोबरच १९६०नंतरच्या पुढील तीन दशकांत अस्तित्वात असलेली विवाहसंस्था, त्यातील अर्थकारण, कुटुंबांतर्गत राजकारण आणि समाजकारण यांचे चित्रण. साधारण १९९०-९५नंतर जागतिकीकरण, उदारीकरण यांच्या रेट्यामध्ये विवाहसंस्थेकडे पाहण्याचा मध्यमवर्गीय दृष्टिकोन हळूहळू बदलत चालला आहे. मुलेमुली विवाहाच्या उद्देशाने घरातल्यांच्या अनुपस्थितीत सर्रास भेटत आहेत. लग्नखर्च वाटून घेण्याची मानसिकता तयार होत आहे. या पार्श्वभूमीवर पुस्तकात मांडलेले विचार आणि अनुभव हे १९६० ते १९९० या तीन दशकांतील विवाहसंस्थेचा इतिहास आणि दस्तऐवज म्हणून महत्त्वाचे ठरतात.

***मृणालिनी चितळे,*** ९८२२३०१७५०

*विनया खडपेकर यांच्याशी 'विवाह नाकारताना' या पुस्तकाबद्दल झालेला संवाद जरूर ऐका 'राजहंसी मोहोर' या पॉडकास्टमधून.*

मुलीचं लग्न होतं, तेव्हा तिचं जीवन समूळ बदलतं;
हे सर्वमान्य! पण ती एकटीनं, स्वतंत्र राहण्याचा
निर्णय घेते, तेव्हा? तिचं जीवन कसं बदलतं?
काय होतं? स्वत:च्या निर्णयानं, स्वतंत्रपणे,
एकल राहणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन.

विवाह नाकारताना

विनया खडपेकर

किंमत : ₹ ४३०/- । (ट.ख. ₹ ५०)



## ‘राजहंसी’ विविधा




चीन जितका आधुनिक, तितकाच ऐतिहासिकही.
आजही भारताबरोबरचा संघर्ष असेल वा अमेरिकेशी स्पर्धा-
चिनी सत्ताधीश आपली धोरणं ठरवताना इतिहासात
दडलेल्या सूत्रांचा आधार घेत असतात. हे चकित
करणारं विलक्षण चिनी प्रारूप समजावून देणारं-

### मेड इन चायना

गिरीश कुबेर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४५०/-
(ट.ख. ₹ ५०) । (हार्डबाऊंड)

एका सच्च्या समाजवाद्याचं उदास, चिंतनशील स्वगत.
अनेक अंतर्विरोधांनी ग्रासलेलं भारताचं बहुआयामी
समाजजीवन चंद्रशेखरांनी पुस्तकात सजीव केलंय.
पुस्तकात चंद्रशेखर म्हणतात,
‘राजकारण सत्यावर चालत नाही हेच खरं.’
**- अंबरीश मिश्र**




### चंद्रशेखर : जसं जगलो तसं

अनुवाद : अंबरीश मिश्र

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)




‘कितीही अडचणी, वाईट प्रसंग आले, तरी डरायचं नाही’
असा संदेश देणारी वेलवर्गीय वनस्पती - ‘दौशाड’!
तिचाच आदर्श घेऊन माणदेशातील माणसं हिमतीनं
जगत असतात. त्यांची कहाणी सांगणारं...

### दौशाड

डॉ. नंदकुमार राऊत

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)




## गाऊ त्यांना आरती

'भारतरत्न' हा सर्वोच्च
नागरी सन्मान मिळवलेल्या
कर्तृत्ववंतांची 'राजहंसी' चरित्रे

# गगन समुद्री बिंबले...

*सत्यजित राय यांना १९९२ साली 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरिक सन्मानाने गौरवण्यात आले. नामांकित साहित्यकृतींवर आधारित सत्यजित राय यांच्या चित्रपटांचा रसास्वाद असलेले, विजय पाडळकर लिखित 'गगन समुद्री बिंबले...' हे पुस्तक 'राजहंस'ने प्रकाशित केले. त्यातील 'गगन समुद्री बिंबले...' या प्रकरणातील हा संपादित अंश.*

एक सात-आठ वर्षांचा मुलगा एकदा एका महाकवीला भेटला होता. त्या मुलाच्या आईने कवींना मुलासाठी काही संदेश देण्याची विनंती केली. कवींनी त्याची वही ठेवून घेतली. मुलाला दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले. वही परत करताना ते म्हणाले, ''मी तुझ्यासाठी काही ओळी लिहिल्या आहेत. त्या तुला आज कळणार नाहीत; पण तू जेव्हा मोठा होशील, तेव्हा त्यांचा अर्थ तुला समजेल.'' त्या ओळी अशा होत्या :

'मी जगभर प्रवास केला.
नद्या आणि पर्वत पाहण्यासाठी दूरवर भटकलो.
आणि सारे काही पाहिले,
पण माझ्या घरासमोरच्या, एका गवताच्या पात्यावरील
दवबिंदू पाहण्याचे मात्र मी विसरलो.
एक दवबिंदू ... ज्याच्या इवल्याशा परिघात
भोवतालचे सारे जग प्रतिबिंबित झाले होते.'

ते महाकवी होते रवींद्रनाथ टागोर व तो मुलगा होता, पुढे चालून जगातील एक श्रेष्ठ चित्रपट-दिग्दर्शक बनलेला ... सत्यजित राय!

सत्यजित राय यांचा जन्म १९२१ साली कलकत्त्याच्या एका मान्यवर घराण्यात झाला. त्यांचे आजोबा उपेंद्रकुमार राय हे लेखक व प्रकाशक होते. त्यांना छपाईच्या

तंत्रज्ञानाचीही उत्तम माहिती होती. ते पियानो, व्हायोलिन वाजवत; चित्रे काढत, लहान मुलांसाठी गोष्टी व कविता लिहीत. ते ब्राह्मोसमाजी होते. आधुनिक युरोपातील विचारांचा त्यांच्यावर बराच प्रभाव होता. सत्यजितचे वडीलही लहान मुलांसाठी कविता व बडबडगीते लिहीत. ही गीते बंगालमध्ये अजून लोकप्रिय आहेत. (मोठे झाल्यावर सत्यजितनीही मुलांसाठी कथा-कादंबऱ्या लिहिल्या, चित्रपटही निर्माण केले; हा या परंपरेचाच परिणाम असावा.) या घराण्यातील प्रत्येकाला कुठले न कुठले कलेचे वरदान होते. त्यांची आई चांगली गायिका होती व मातीची शिल्पे तयार करण्याच्या कलेत तिला गती होती. सत्यजित दोन वर्षांचा असतानाच त्याचे वडील वारले. त्याच्या कुटुंबाचा व टागोरांचा फार जवळचा संबंध होता. टागोरांच्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा व लेखनाचा सत्यजितवर उमलत्या वयात फार मोठा प्रभाव पडला. कलकत्ता युनिव्हर्सिटीमधून ग्रॅज्युएट झाल्यावर चित्रकलेच्या शिक्षणासाठी सत्यजित शांतिनिकेतनमध्ये गेले. तेथे त्यांनी दोन-अडीच वर्षे काढली. या काळाचे वर्णन त्यांनी आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचा व जडणघडणीचा काळ, असे केले आहे.

ते लिहितात :

'मी चित्रकला शिकत होतो व माझ्या फावल्या वेळात मी वाचन करायचो, निसर्गाची ओळख करून घ्यायचो, चिंतन करायचो व अनेक लोकांचे जवळून निरीक्षण करायचो. या बिंदूपासूनच पुढे अनेक गोष्टींची सुरुवात झाली. माझ्या चित्रपटातील कामाचीही. माझ्या आजोबांची आणि टागोरांची मैत्री होती. ते समवयस्क होते. खरे तर टागोरांनीच मला काही काळ शांतिनिकेतनमध्ये येऊन राहण्यास सांगितले. मी शहरात राहणारा. खेड्यात येऊन राहण्याची कल्पना प्रारंभी मला फारशी रुचली नव्हती; पण येथल्या वास्तव्याचा माझ्या आयुष्यावर खूपच चांगला परिणाम झाला.'

शांतिनिकेतनमधील वास्तव्यातच त्यांची निसर्गाच्या विविध रूपांशी फार




मिस्कील आणि मनस्वी. प्रेमळ आणि फटकळ.
नर्मविनोदी आणि स्पष्टवक्ती.
आग्रही आणि पारदर्शी.
सईच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू
उलगडणारे आत्मकथन!

**सय** माझा कलाप्रवास

सई परांजपे

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

जवळून ओळख झाली. निसर्गाशी त्यांचे नव्याने नाते जुळले. या नात्यामुळेच 'पथेर पांचाली'मधील निसर्ग एवढ्या जिवंत व आकर्षक स्वरूपात ते दाखवू शकले. या काळाबद्दल सत्यजित पुढे लिहितात :

'शांतिनिकेतनमध्ये ज्यांनी आम्हांला शिकवले, ते केवळ प्राध्यापक नव्हते. ते मोठे कलाकार होते. त्यांना दृष्टी होती. जीवनाविषयीची खोल समज होती... या काळात मी खूप वाचनही केले. कथा-कादंबऱ्या, भारतीय साहित्य, अभिजात जागतिक वाङ्मयकृती. माझ्या काकांच्या घरामधील वातावरणातच संगीत होते. माझे सारे काका, आत्या गाणी म्हणत. पण मी संगीतात फारसा रमलो नाही...

'जपानने कलकत्त्यावर हल्ला केला व मी शांतिनिकेतन सोडले. मला कमर्शियल आर्टमध्ये रस होता. कलकत्त्याला आल्यावर मी एका ब्रिटिश एजन्सीत लेआउट करणारा म्हणून नोकरी पत्करली. पुढे सहा वर्षांत मी तेथे आर्ट डायरेक्टर बनलो.'

तरुण सत्यजितचे व्यक्तिमत्त्व असे अनेक अंगांनी फुलत होते. अशा वेळी त्यांच्या हाती विभूतिभूषण बंदोपाध्याय यांचे 'पथेर पांचाली' हे पुस्तक आले. ह्या पुस्तकाच्या लहान मुलांसाठीच्या एका आवृत्तीची चित्रेही सत्यजितनी काढली. प्रसिद्ध बंगाली चित्रपट समीक्षक श्री. चिदानंद दासगुप्ता यांनी 'पथेर पांचाली' या चित्रपटाबद्दल लिहिले आहे, की या चित्रपटाने इतर समकालीन कलांतील सामर्थ्य व मूल्ये चित्रपटांच्या माध्यमात आणली. सत्यजित राय यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा तो परिणाम होता. चिदानंद दासगुप्ता आणि समविचारी मित्रांना सोबत घेऊन १९४७ साली सत्यजितनी 'कलकत्ता फिल्म सोसायटी'ची स्थापना केली. या सोसायटीत जागतिक पातळीवरचे महत्त्वपूर्ण चित्रपट दाखवले जात. त्यांवर चर्चा केली जाई. भावी दिग्दर्शक घडण्यास आता सुरुवात झाली होती. या काळातच सत्यजितनी पटकथा-लेखनाचा एक अभिनव प्रयोग करून पाहिला. एखाद्या साहित्यकृतीवर चित्रपट बनतो आहे असे समजले, की ते ती कलाकृती वाचून काढत व तिच्यावर आधारित पटकथा लिहून काढीत. नंतर त्या चित्रपटाशी ते आपली पटकथा ताडून पाहत.

१९५० साली सत्यजितना एक मोठी संधी मिळाली. कंपनीतर्फे त्यांना पाच महिन्यांसाठी लंडनला पाठवण्यात आले. या पाच महिन्यांच्या काळात सत्यजितनी सुमारे शंभर चित्रपट पाहिले. जागतिक चित्रपटक्षेत्रातील श्रेष्ठ दिग्गजांच्या



किंमत : ₹ २६०/- । (टपाल ₹ ५०)

कलाकृतींशी त्यांची येथे ओळख झाली. डि सिका, फ्लॅहार्ती अशा नामवंतांच्या चित्रपटांचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. ‘बायसिकल थीव्हज्’सारख्या नववास्तववादी चित्रपटांनी त्यांना झपाटून टाकले. या सुमारासच चित्रपट-दिग्दर्शक बनण्याचा त्यांचा विचार पक्का झाला असावा. भारतात परतल्यावर त्यांनी प्रथम ‘पथेर पांचाली’च्या चित्रीकरणाचे हक्क मिळवले व आपल्या पहिल्या चित्रपटाची सुरुवात केली.

‘पथेर पांचाली’च्या पटकथेवर त्यांनी फार कसून काम केले. त्यांनी ती अनेकदा लिहून काढली. एवढेच नव्हे, तर प्रत्यक्ष चित्रीकरणापूर्वी चित्रपटात घ्यायचा प्रत्येक शॉट त्यांनी चित्ररूपाने रेखाटला होता. स्वत: चित्रकार असल्यामुळे प्रसंगाच्या दृश्यरूपाची त्यांना उत्तम जाण होतीच. कॅमेऱ्याचे अँगल, प्रकाशयोजना, पात्रांच्या हालचाली असे तपशीलही त्यांनी जागोजागी लिहून ठेवले होते. अशा प्रकारे पद्धतशीर पाया रचण्याची योजना भारतात तरी प्रथमच सत्यजित यांनी आणली. ह्या चित्रपटासाठी भांडवल उभे करताना मात्र सत्यजितना फार त्रास झाला. दोन वेळा हा चित्रपट बंद पडतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. शेवटी बंगाल सरकारने, नियम काहीसे डावलून या चित्रपटाला अर्थसाहाय्य केले व तो पूर्ण होऊ शकला.

‘पथेर पांचाली’ने भारतीयच नव्हे, तर जागतिक चित्रपटसृष्टीत एक इतिहासच घडवला. फ्रान्समधील ‘कान’ या प्रतिष्ठेच्या चित्रपटमहोत्सवात ‘द बेस्ट ह्यूमन डॉक्युमेंट’ असा त्याचा गौरव करण्यात आला. भारताचे नाव प्रथमच एवढ्या ठळकपणे चित्रपटाच्या इतिहासावर उमटले. या चित्रपटाला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. शिवाय विविध चित्रपट महोत्सवांत त्याला अनेक पारितोषिके मिळाली.

‘पथेर पांचाली’ व ‘अपराजितो’ या कादंबऱ्यांवर सत्यजितनी तीन चित्रपट निर्माण





त्यांनी मराठी रंगभूमीला नवं भान दिलं.
त्यांच्या दिग्दर्शनामुळे कलाकारांना
नवी दृष्टी आली. त्या सांगत आहेत,
स्वत:ची आणि मराठी रंगभूमीची कथा

**झिम्मा**
गोफ आठवणींचा

विजया मेहता

आवृत्ती आठवी । किंमत : ₹ ६५०/- । (ट.ख. ₹ ५०)

केले. ह्या त्रिपदीने त्यांना दिगंत कीर्ती मिळवून दिली. येथूनच सत्यजित राय या नावाची एक अभिजात विधा निर्माण झाली. पुढे सुमारे छत्तीस वर्षे, १९९२ साली मृत्यू येईपर्यंत सत्यजितनी सातत्याने वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटांची निर्मिती केली. त्यांनी जसे कालखंडपट निर्माण केले; तसेच आधुनिक बंगालचे दर्शन घडवणारे, सामाजिक प्रश्न मांडणारे चित्रपटही निर्माण केले. छोट्या मुलांसाठीही त्यांनी उत्तम करमणूकप्रधान, मनोरंजक व आशयघन चित्रपट तयार केले. त्यांनी काही अनुबोधपटही बनवले.

सत्यजित राय यांच्या चित्रपटांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केलेले श्रेष्ठ साहित्यकृतींचे चित्रपटीकरण (Adaptation) होय. त्यांचे सुमारे ऐंशी टक्के चित्रपट कुठल्या न कुठल्या साहित्यकृतीवर आधारित होते. ‘पराश पथ्थर’ हा परशुराम यांच्या कथेवर आधारित होता; तर ‘जलसाघर’ हा ताराशंकर बंदोपाध्याय यांच्या कथेवर. ‘देवी’ (लेखक - प्रभात मुखर्जी); ‘घरे बाई रे’, ‘तीनकन्या’ व ‘चारुलता’ (रवींद्रनाथ टागोर), ‘अभिजान’ (ताराशंकर), ‘महानगर’ (नरेंद्रनाथ मित्र), ‘का पुरुष ओ महापुरुष’ (प्रेमेंद्र मित्र), ‘अरण्येर दिन रात्री’ व ‘प्रतिद्वंद्वी’ (सुनील गांगुली), ‘सीमाबद्ध’ व ‘जन अरण्य’ (शंकर), ‘शतरंज के खिलाडी’ (प्रेमचंद) व ‘अशांनी संकेत’ (विभूतिभूषण) हे त्यांचे गाजलेल्या साहित्यकृतींवरचे चित्रपट. त्यांचा ‘गणशत्रू’ हादेखील इब्सेनच्या ‘एनिमी ऑफ द पीपल’वर आधारित होता, तर ‘गोपी गाये बाघा बाये’ची कथा त्यांच्या आजोबांची होती.

सत्यजित राय यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. आपल्या चित्रपटांचे पटकथा-लेखन, दिग्दर्शन, पोस्टर्स तयार करणे या गोष्टी ते स्वतःच करत. सुरुवातीला (अपू-त्रिवेणीसाठी) त्यांनी रविशंकर यांच्याकडून पार्श्वसंगीत तयार करून घेतले होते, पण नंतर संगीताची जबाबदारीही त्यांनीच उचलली. त्यांनी सत्तावीस दीर्घ चित्रपट, पाच अनुबोधपट आणि दूरचित्रवाणीसाठी तीन चित्रपट तयार केले. ते स्वतः उत्तम


अभिनंदन! अश्वमेघ ग्रंथालय व वाचनालय, सातारा



राज्यस्तरीय अक्षरगौरव साहित्य
विशेष पुरस्कार (२०२३)

**वसुंधरेचे शोधयात्री**

◆

अनुराग लव्हेकर



लेखकही होते. डिटेक्टिव्ह कथा-कादंबऱ्यांची सतरा पुस्तके, अनेक विज्ञानकथासंग्रह व इतरही दहा कथासंग्रह त्यांनी लिहिले. शिवाय चित्रपटविषयक विपुल असे लिखाण त्यांनी केले. ‘संदेश’ हे मुलांसाठीचे नियतकालिक त्यांच्या आजोबांनी सुरू केले होते, ते नंतर बंद पडले. सत्यजितनी या नियतकालिकाचे पुनरुज्जीवन केले. अनेक पुस्तकांची रेखाटने, वेष्टने केली. इतकेच नव्हे, तर मुद्रणकलेच्या क्षेत्रात ‘रे रोमन’ व ‘रे बिझार’ असे दोन नवे टाइप तयार केले. ते उत्तम फोटोग्राफरही होते.

सत्यजितनी एका नव्या प्रकारच्या चित्रपटाला जन्म दिला. हा चित्रपट वास्तववादी होता; पण कुठेही रटाळ किंवा बोजड नव्हता. जीवनातल्या प्रखर वास्तवाला त्यांनी काव्यात्मतेची, सहृदयतेची व स्वप्नांची जोड दिली. भव्य आकाशाच्या पार्श्वभूमीवर बगळ्यांची माळ सरकत जावी, त्याप्रमाणे त्यांच्या चित्रपटांत मानवी नातेसंबंधांतील सूक्ष्म बारकावे भरलेले आहेत. त्यांनी अतिनाट्याचा (मेलोड्रामा) वापर केला आहे, पण तोही अत्यंत संयमाने. ते हळुवार होतात, पण भावुक होत नाहीत. आपल्या पात्रांबद्दल त्यांच्या मनात अपार सहानुभूती असते व ही सहअनुभूतीच प्रेक्षकांच्या मनात त्यांचे चित्रपट पाहताना संक्रमित होते. सत्यजित आपल्याला जीवनाची एकदम नवी बाजू दाखवत नाहीत; पण ते जे जीवन दाखवतात, ते आपल्याला ओळखीचे असूनही नवे भासते; कारण त्याला एका विलक्षण आगळ्यावेगळ्या नजरेने सत्यजितनी पाहून आपल्यासमोर मांडलेले असते आणि म्हणूनच अकिरा कुरोसावा जेव्हा म्हणतात की, ‘Not to have seen the cinema of Satyajit Roy means existing in the world without seeing the sun or the moon.’, तेव्हा त्यात अतिशयोक्ती वाटत नाही.

सत्यजित रायनी ‘फेलुदा’ या नावाचे एक अफलातून व्यक्तिचित्र आपल्या कादंबऱ्यांतून निर्माण केले आहे. हा एक अत्यंत बुद्धिमान असा डिटेक्टिव्ह आहे. हा माणूस एक चालता-बोलता ज्ञानकोशच आहे. साहित्य, विविध कला, भाषाशास्त्र,




सोनाली कुलकर्णी एक गुणी अभिनेत्री. सोनाली माणसांना वाचते आणि शब्दांतून त्यांची व्यक्तिचित्रं रेखाटते. अशा संवेदनशील, संवादोत्सुक अभिनेत्रीला पाहण्या-ऐकण्याएवढंच ‘वाचणं’ही किती लोभस असू शकतं, याचं उदाहरण म्हणजे...

सो कुल.. टेक २

सोनाली कुलकर्णी

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

विज्ञानाच्या विविध शाखा, इतिहास... प्रत्येक गोष्टीत त्याला रस आहे आणि प्रचंड माहितीही आहे. त्याला प्रवासाची विलक्षण आवड आहे आणि आपल्या ज्ञानात सतत भर टाकण्याची इच्छा व जिज्ञासा आहे. सत्यजित राय यांनी एक प्रकारे त्याद्वारे आत्मचित्रणच केले आहे.

सत्यजित राय यांच्या बहुअंगी व्यक्तिमत्त्वासंबंधीची एक आठवण पूर्णेन्दू पत्रिका यांनी सांगितली आहे. एके दिवशी ॲलेन गिन्सबर्ग हा नवकवी रायना भेटण्यासाठी आला. त्या दिवशीची पूर्ण संध्याकाळ तो चित्रपटांविषयी बोलत होता आणि सत्यजित अमेरिकन कवितेवर बोलत होते.

२३ एप्रिल, १९९२ रोजी सत्यजित राय यांची इहलोकीची यात्रा संपली. ते वारल्यानंतर उत्पल दत्त यांनी लिहिले : ‘राय हा मानवतेच्या चैतन्यातला एक क्षण होता.’

❖



गुरुदत्तच्या चित्रनिर्मितीच्या ऐतिहासिक आणि
सामाजिक पार्श्वभूमीबरोबरच सदर पुस्तकात गुरुदत्तच्या
चित्रपटांचा कथावस्तू, घाट, तंत्र आणि आशय
या अंगांनी विचार केला आहे.

गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका

अरुण खोपकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

प्रत्येकाच्या मनात असते
हुरहुर लावणारी एक स्वप्नसृष्टी.
तिला साद घालणारी सिनेमाची एक सुंदर
दुनिया या पुस्तकात वस्तीला आलीय...

सुंदर ती दुसरी दुनिया

अंबरीश मिश्र

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



# वाचकहो, खास तुमच्यासाठी

नमस्कार, राजहंसचे रसिक वाचक कायमच आम्हाला
पुस्तकांबद्दलच्या प्रतिक्रिया पत्र आणि ई-मेल यांद्वारे पाठवत असतात.
आता तुम्ही तुमच्या प्रतिक्रिया व्हिडिओच्या माध्यमातून आम्हाला पाठवू शकता.
त्यासाठी तुम्हाला

- १. बाय गं... / *विद्या पोळ - जगताप*
- २. तंत्र मुक्ती / *दिलीप कुलकर्णी*
- ३. फकिरी / *दत्ता बारगजे*
- ४. आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग / *अपूर्वा प्रदीप जोशी*
- ५. आरोही / *राजेश्वरी किशोर*

यांतील एका किंवा पाचही पुस्तकांबद्दल स्वतंत्र व्हिडिओ पाठवायचा आहे,
आमच्या **८३७८८३६८३६ या व्हॉट्सॲप क्रमांकावर**.

आणि हो, त्यासाठी खाली दिलेल्या सूचना लक्षात घेऊन त्याप्रमाणे व्हिडिओ पाठवावा.

- व्हिडिओ उभा शूट करावा. (portrait mode)
- व्हिडिओ ३० सेकंदांपर्यंत असावा.
- बोलणारी व्यक्ती व्यवस्थित दिसावी, विशेषत: चेहरा नीट दिसावा.
- आवाज स्पष्ट ऐकू यावा.
- व्हिडिओ पुरेशा प्रकाशात शूट करावा.
- व्हिडिओ ३० सप्टेंबर २०२४पर्यंत पाठवावा.

तर वाचा वरील पुस्तके आणि लवकरात लवकर आम्हाला तुमचा व्हिडिओ पाठवा.
तांत्रिकदृष्ट्या योग्य व्हिडिओ राजहंसच्या सोशल मीडियावर प्रसारित केले जातील.



# चित्र पाहीन आवडी

## कलेसाठी-कला : एक विचार

मागील भागात आपण ‘आनंदासाठी कला’ ही कल्पना पहिली. त्यात आपण चित्रकार मोनेट याची चित्रे पहिली. आता आपण कलेसाठी-कला, ही संकल्पना पाहू आणि जेम्स व्हिस्लर ह्या चित्रकाराची कलाकृती पाहू या.

खरे तर ‘आर्ट फॉर आर्ट्स सेक’ (कलेसाठी-कला) हा एक इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध वाक्प्रचार आहे. हा विचार सौंदर्यविषयक चळवळीतून १९व्या शतकात उदयास आला आहे. ह्या विचाराने ‘कला ही कोणत्याही नैतिक, राजकीय किंवा शैक्षणिक हेतूसाठी नसून केवळ तिच्या स्वत:च्या सौंदर्यासाठी आणि आंतरिक मूल्यासाठी अस्तित्वात असावी’ असे मांडले. या कल्पनेचा पुरस्कार कलाजगतात मोठ्या प्रमाणात केला गेला. ही एक महत्त्वाची कला चळवळ मनाली जाते. सामाजिक आणि राजकीय भाष्य करण्यासाठी किंवा नैतिक संदेश देण्यासाठी कलेचा एक वाहन म्हणून वापर केला जात होता, तो अयोग्य वाटला. त्या काळातला प्रतिसाद किंवा प्रतिवाद होता असे म्हणणे योग्य राहील.

माणसे चित्रे का काढतात? हा मूलभूत प्रश्न समोर ठेवून आपण पुढे जाऊ. या संदर्भात तर ही विचार चळवळ आणि त्यामागील भूमिका विशेष महत्त्वाची ठरणार आहे. ‘आर्ट फॉर आर्ट्स सेक’ असे प्रतिपादन केले की कला ही इतर बाह्यप्रभावांपासून मुक्त असली पाहिजे, असे साहजिकच स्वीकाराले जाते. तिचे स्वरूप, सौंदर्यशास्त्र आणि भावना जागृत करण्याची क्षमता, कोणत्याही उपयुक्ततेपासून किंवा संदेशापासून स्वतंत्र असणे आवश्यक आहे. जरा ही संकल्पना किचकट वाटू शकते. परंतु ही संकल्पना समजून घेणे ह्या प्रवासात महत्त्वाचे आहे.

### चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी

‘आर्ट फॉर आर्ट्स सेक’ ही संकल्पना १९व्या शतकाच्या उत्तरार्धात, विशेषत: युरोपमध्ये भरभराट झालेल्या सौंदर्यविषयक चळवळीशी घट्टपणे जोडलेली आहे. कलेने उपदेशात्मक किंवा उपयुक्ततावादी हेतूने काम केले पाहिजे, या कल्पनेविरुद्ध हे बंड होते. जेम्स मॅकनील व्हिस्लर, ऑस्कर वाइल्ड आणि प्री-राफेलाइट्स यांसारख्या कलाकारांनी सखोल सामाजिक किंवा नैतिक भाष्य करण्याऐवजी सौंदर्य आणि स्वरूपावर लक्ष केंद्रित करून ही कल्पना स्वीकारली.

या कल्पनेचा फ्रान्समध्येही स्वीकार झाला. थिओफिल गौटियर आणि व्हिक्टर कजिन यांसारख्या लेखक आणि तत्त्वज्ञांनी कलेचा खरा उद्देश केवळ सुंदर असणे हा आहे, या कल्पनेला खतपाणी केले. त्यांच्या मते, कलेला कोणत्याही प्रकारच्या बाह्य प्रमाणीकरणाच्या अधीन केले जाऊ नये. किंवा तिच्या नैतिक किंवा राजकीय सामग्रीवर न्याय केला जाऊ नये. या अर्थाने, कला स्वायत्त आहे, ती केवळ स्वत:च्या फायद्यासाठी अस्तित्वात आहे.

## ‘कलेसाठी कला’ची तत्त्वे

‘आर्ट फॉर आर्ट्स सेक’ यामागील तत्त्वे यावर जोर देतात की, कला ही स्वत:मध्ये मौल्यवान आहे. काही बाह्य उद्दिष्ट साध्य करून तिच्या अस्तित्वाचे समर्थन करण्याची गरज नाही. ही तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत:

१. सौंदर्यविषयक स्वायत्तता : कला शिकवण्यासाठी, उपदेश करण्यासाठी किंवा सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी नाही. ही दैनंदिन जीवनापासून आणि व्यावहारिक, राजकीय किंवा नैतिक चिंतांच्या क्षेत्राबाहेरील कार्यांपासून वेगळी आहे.

२. सौंदर्यावर भर : कलेचा प्राथमिक भर हा सौंदर्य आणि स्वरूपावर असावा. संदेश देण्याच्या विरुद्ध दृष्टिकोन असावा. रंग, रचना आणि पोत यांसारख्या सौंदर्यात्मक गुणांना अर्थापेक्षा जास्त महत्त्व दिले जाणे गरजेचे वाटत गेले.

३. उपयुक्तता नाकारणे : कलेचा व्यावहारिक हेतू असू नये. गरजेप्रमाणे कला बदलण्याची पद्धतच गैर आहे.

या कल्पना ‘रोमँटिक आणि वास्तववादी’ काळात प्रचलित असलेल्या सामाजिक किंवा राजकीय संकल्पनाचे प्रतिबिंब म्हणून कलेच्या कल्पनेच्या अगदी विरुद्ध होत्या. उदाहरण पाहू या म्हणजे शब्दातील जडपणा काहीसा कमी होईल.

## जेम्स मॅकनील व्हिस्लरचे ‘नॉक्टर्न इन ब्लॅक अँड गोल्ड’

‘आर्ट फॉर आर्ट्स सेक’ या तत्त्वज्ञानाशी संबंधित चित्रकामाचे एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे जेम्स मॅकनील व्हिस्लरचे ‘नॉक्टर्न इन ब्लॅक अँड गोल्ड - द फॉलिंग रॉकेट’ (१८७५).

हे पेंटिंग लंडनच्या एका पार्कवर फटाक्यांच्या रोशणाईचे चित्रण करते, अर्थात ते रात्रीचे दृश्य आहे. हे चित्र प्रभावशाली आहे; पेंटचे ठसे, शिंतोडे आणि स्ट्रोक यांद्वारे आपण रोशणाई चित्रातून अनुभवू शकतो, म्हणजे काळजीपूर्वक घेतलेले अपघाती परिणाम येथे परिणामकारक ठरतात. त्याचप्रमाणे दृश्यातील धुके, जवळजवळ अमूर्त चित्रण असावे असा आभास तयार करते. कोणताही सखोल अर्थ किंवा भाष्य व्यक्त करण्यापेक्षा त्या क्षणाचे क्षणभंगुर सौंदर्य टिपणे, हा या प्रकारच्या चित्रकलेचा प्राथमिक



उद्देश आहे. माहोल आणि वातावरणनिर्मिती यावर भर, सैल-मुक्त ब्रशवर्क येथे महत्त्वाचे आहे. एखादी गोष्ट सांगणे किंवा कथनाचा अभाव येथे आहे. सर्व घटकांच्या एकत्रितपणे तयार केलेल्या कलेचे एक उत्तम उदाहरण आहे.

व्हिस्लरचा असा विश्वास होता की, कलेचे कौतुक तिच्या रचना आणि दृश्य सौंदर्यासाठी केले पाहिजे, तिच्या विषयासाठी नाही. त्यांनी सांगितले की, ''कला सर्व टाळ्यांपासून स्वतंत्र असली पाहिजे - भक्ती, दया, प्रेम, देशभक्ती आणि यांसारख्या पूर्णपणे परकीय भावनांशी गोंधळ न करता, एकटे उभे राहून डोळ्याच्या किंवा कानाच्या कलात्मक भावनांना आवाहन केले पाहिजे.'' ह्या चित्राची पुढची गोष्ट रंजक आहे.

जेव्हा व्हिस्लरने 'नॉक्टर्न इन ब्लॅक अँड गोल्ड' प्रदर्शित केले, तेव्हा त्यातून संघर्ष निर्माण झाला, विशेषत: तत्कालीन प्रसिद्ध कला समीक्षक जॉन रस्किन यांच्याकडून; रस्किनने व्हिस्लरवर 'लोकांच्या चेहऱ्यावर रंगाचे भांडे फेकण्याचा' आरोप केला. रस्किनची टीका या कल्पनेवर आधारित होती की, कलेने दर्शकाशी काहीतरी संवाद साधला पाहिजे किंवा वास्तविकतेचे तपशील चित्रणात दिले पाहिजेत. व्हिस्लरने रस्किनवर मानहानीचा दावा केला आणि कोर्टात आपल्या कामाचा बचाव केला; असा युक्तिवाद केला की, पेंटिंगचा हेतू आनंदी होण्याशिवाय इतर काहीही नव्हता. आता 'आनंदासाठी कला का कलेसाठी कला' हा प्रश्न समोर येतो. असो.

**‘कलेसाठी कला’चा चिरस्थायी वारसा**

शेवटी, ‘कलेसाठी कला’ ही एक सशक्त कल्पना आहे हे मात्र नक्की. भारतात प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुपमधील काही कलावंत आणि पुढे बरेचसे चित्रकार ह्या विचाराने प्रभावित दिसतात. अशा साध्यासुध्या, परंतु चित्रातील महत्त्वाच्या विचार संकल्पना समजावून घेऊन मग एखादे प्रदर्शन पाहायला गेलो की, चित्र पाहणे आपल्यासाठी थोडे सोपे होईल असे प्रामाणिकपणे वाटते. काही पूर्वग्रह गळून पडतील, अशी आशा आहे.

***नितीन हडप,*** ९३७२४१८६१५

। श्रद्धांजली ।



राजहंस प्रकाशन प्रकाशित ‘झेप घे’ या पुस्तकाचे लेखक राम बक्षाणी यांचे दि. ८ जुलै २०२४ रोजी दुःखद निधन झाले.

राम बक्षाणी हे भारतीय उद्योगपती होते, तसेच त्यांनी अनेक वर्षे ITL कॉसमॉस समूहाचे अध्यक्ष म्हणून काम केले होते. २००३ साली प्रकाशित झालेले त्यांचे आत्मचरित्र ‘टेकिंग द हाय रोड’ दुबईमध्ये अनेक महिने बेस्टसेलर होते.

राजहंस प्रकाशनातर्फे **राम बक्षाणी** यांना आदरांजली!

---



राजहंस प्रकाशन प्रकाशित ‘बृहन्मुंबई महानगर-पालिका आणि विभाग प्रशासन’ या पुस्तकाच्या लेखिका सुनीती जैन यांचे दि. २२ जुलै २०२४ रोजी दुःखद निधन झाले. राजहंस प्रकाशित ‘इंदिरा’, ‘राजधानीतून’, ‘लक्ष्मणरेषा’ इ. पुस्तकांचे अनुवादक अशोक जैन यांच्या त्या पत्नी.

सुनीती जैन यांनी लिहिलेले ‘वार्ड नंबर ५’ हे पुस्तक गाजले, तसेच त्यांनी ‘डायबॅसिटी’ आणि ‘मधुमेही खुशीत’ अशा अनेक पुस्तकांचे मराठीत अनुवाद केले.

राजहंस प्रकाशनातर्फे **सुनीती जैन** यांना आदरांजली!



# असे जन्मले पुस्तक!

## टगी गँग आणि इतर प्रयोगक्षम नाटिका

मी लिहिलेल्या ‘टगी गँग आणि इतर प्रयोगक्षम नाटिका’ ह्या पुस्तकात २ स्किट, ३ शॉर्टफिल्म आणि १ एकांकिका अशा एकूण सहा नाटिकांचा समावेश आहे. ह्या सर्व नाटिका लहान मुलं, शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिवर्ग आणि ह्या सर्वांचा पालकवर्ग यांना डोळ्यासमोर ठेवून लिहिल्या आहेत.

जशा पालकांकडून लहान मुलांच्या काही अपेक्षा असतात, तशाच लहान मुलांच्याही पालकांकडून / मोठ्यांकडून / समाजाकडून काही अपेक्षा असतात. त्या अपेक्षांचा, त्यांच्या योग्यायोग्यतेनुसार समन्वय साधला गेला, तर भविष्यात अनेक गोष्टी सुकर होऊ शकतील. प्रस्तुत पुस्तकातील काही नाटिका हाच समन्वय साधण्याचा प्रयत्न करतात. काही नाटिका लहान मुलांसह इतर वाचकवर्गाला निखळ मनोरंजनाचा आनंद देतात.

ह्या नाटिकांमध्ये मांडलेले विषय नुसत्याच गोष्टीरूपात लिहिण्यापेक्षा जर लहान मुलं त्यातून सादरीकरणाचा अनुभव घेऊ शकली तर? हा प्रश्न डोक्यात घोळत होता, म्हणून हे विषय नाट्यरूपात लिहिण्याचं ठरवलं. त्यातही एकांकिका, स्किट (प्रहसन) आणि शॉर्टफिल्म (लघुपट) अशा तीनही माध्यमांचा वापर करायचं ठरवलं. एकांकिका, स्किट आणि शॉर्टफिल्म ह्या तीनही माध्यमांच्या सादरीकरणाचा गाभा हा अभिनयच असला, तरी त्यांची सादरीकरणाची तंत्रं वेगवेगळी आहेत. शॉर्टफिल्म ह्या प्रकाराचं लेखनतंत्रही वेगळ्या स्वरूपाचं आहे. शॉर्टफिल्मची कथा, ही ‘पटकथा - संवाद’ ह्या स्वरूपात लिहिली जाते. प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केलेल्या तीनही शॉर्टफिल्मचं लिखाण ‘पटकथा - संवाद’ लेखनाचं तंत्र वापरूनच लिहिलेल्या आहेत. वाचकांना / कलाकारांना ह्या तंत्राची ओळख व्हावी, त्यांना त्यांचं सादरीकरण करताना,




किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)

दिग्दर्शन, छायाचित्रण, चित्रीकरणस्थळाची निवड अशा पूरक आणि आवश्यक गोष्टीही आजमावून बघता याव्यात हाही एक हेतू होता.

पुस्तकातील सर्व नाटिकांचे विषय वेगवेगळे आहेत. काही शिकवण देणारे, काही संस्कार करणारे, काही हसत-खेळत मनोरंजन करणारे तर काही अंतर्मुख करणारे आहेत. आपण सर्वच जण एखाद्या प्रसंगाकडे / घटनेकडे काय चांगलं? काय वाईट? काय व्हायला पाहिजे? काय टाळलं पाहिजे? कोण चुकलं? कोण बरोबर? अशा अनेक प्रश्नांद्वारे बघत असतो. ह्याच प्रश्नांची लहान मुलांच्या ‘चश्म्यातून’ उत्तरं शोधताना सुचलेले हे विषय आहेत. ह्या सर्व नाटिका साधारणत: एका वर्षाच्या कालावधीत लिहून झाल्या आहेत.

लिहून आणि टाइपही करून झालेल्या ह्या नाटिका नुसत्याच माझ्या लॅपटॉपमध्ये न राहता त्या पुस्तकरूपात प्रकाशित करण्याचाही मनोदय होता, जेणेकरून पुस्तकाच्या रूपाने त्या महाराष्ट्रातील वाचकांपर्यंत पोचतील आणि आता तर ई-बुकच्या माध्यमातून देशविदेशातही पोचतील. त्यांचे वेगवेगळ्या शाळांमध्ये, सोसायट्यांमध्ये, इतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये रंगमंचावर किंवा कॅमेऱ्यासमोर प्रयोगही केले जाऊ शकतील.

मी स्वत: पुस्तकवेडा आहे. ‘राजहंस प्रकाशन’सारख्या प्रथितयश प्रकाशनाची शंभराहून अधिक पुस्तकं माझ्या संग्रहात आहेत; ह्या ‘राजहंसी’ पुस्तकांचं विषयवैविध्य, वेगळेपण आणि दर्जा मला नेहमीच भावला आहे. आपलंही लिखाण ‘राजहंस’तर्फे प्रकाशित करता येईल का, असा विचार डोक्यात येत होता. त्यामुळे एके दिवशी हे लिखाण ‘राजहंस’च्या दरबारी सुपुर्द केलं. पुढील काही दिवस त्यांच्याकडून उत्तर येईपर्यंत मनात भीती, हुरहुर अशा भावनांचा कल्लोळ चालू होता. पण काही दिवसांतच श्री. सदानंद बोरसे सर, वर्षाताई गजेंद्रगडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी



उत्साह देणाऱ्या दिवसाला पाहून अंधाराला काय वाटतं? वर्षानुवर्षं एकाच जागी साचलेल्या तळ्याचं आयुष्य कसं आहे? जंगलं कमी झाल्यामुळे घर हरवलेल्या प्राण्यांना काय वाटतं? पशू-पक्षी संपावर गेले तर काय होईल? या कविता वाचून अशा प्रश्नांची काय उत्तरं मिळतायत पाहू या-

**प्रेम करू या पृथ्वीवर**

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ १२०/-

ह्या लिखाणाचं मूल्यमापन करून पुस्तक प्रकाशनाचा निर्णय कळवला. हा निर्णय ऐकून माझ्या मनातील भीती निघून जाऊन फक्त 'कधी?' ही हुरहुर शिल्लक राहिली.

त्यानंतरच्या टप्प्यात पुस्तकाचं नाव ठरवण्यापासून ते पुस्तक बाह्य आणि अंतर्गत रूपात आकर्षक होण्यासाठी 'राजहंस'च्या सर्वच सहकाऱ्यांनी मोलाची भर घातली. विशेष म्हणजे त्यांनी 'आपलंच खरं' ही वृत्ती न ठेवता वेळोवेळी मलाही सूचना / प्रतिक्रिया / निर्णयप्रक्रिया यामध्ये समाविष्ट केलं. मी दिलेल्या काही सूचना / प्रतिक्रियांचा स्वीकारही केला. त्यामुळे या पुस्तकनिर्मितिप्रक्रियेत मला 'राजहंस'बद्दल एक आपलेपणाची भावनाही निर्माण झाली.

पुस्तक खरंच देखणं झालं आहे. पुस्तकात नाटिकेच्या विषयानुरूप केलेली चित्ररेखाटनंही अत्यंत समर्पक आहेत. 'राजहंस'तर्फे मी लिहिलेल्या ह्या नाटिकांचं पुस्तक प्रसिद्ध झालंय, ही माझ्यासाठी अत्यंत भाग्याची गोष्ट आहे.

ह्या पुस्तकातील नाटिका प्रायोगिक स्वरूपात सादर करताना लहान मुलांना त्यांच्याच विश्वातल्या गोष्टी त्यांच्या प्रत्यक्ष सहभागातून अनुभवता याव्यात, त्यांचं हसतखेळत मनोरंजन व्हावं, त्यांना अभिनयाची संधी मिळावी अशी अपेक्षा आहे. यथावकाश ही अपेक्षा पूर्ण व्हावी, म्हणजे 'पुस्तकानं जन्मानंतर चांगलंच बाळसं धरलंय' असं म्हणायला मी मोकळा होईन.



धन्यवाद!

***अजित ठोसर***

स्थलांतर करू पाहणाऱ्या पक्ष्यांच्या एका थव्याला प्रवासामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. एका टप्प्यावर प्रत्यक्ष नेत्याचे नीतिधैर्य संपते. नेताहीन थवा दिशाहीन होऊन विखुरतो, प्रवासात शिकून शहाणा होत असलेला एक लहान पक्षी त्याला धीर देतो. त्याची गोष्ट सांगणारे -

**नंदनवन** (संगीत-नृत्य-नाट्य)

माधव वझे

किंमत : ₹ ५०/- । (ट.ख. ₹ ५०)



## 'राजहंसी' कवितादालन



निवडुंगातून फूल यावे, तसे कवीच्या
काटेरी अनुभवाला आलेले करुणेचे फूल
या कवितांना साद घालते.
कवीची भाषा करुणेचा स्वर लाभलेली
सत्याची भाषा आहे.

### व्याकुळ पिंपळ

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)

हिमांशु कुलकर्णी यांच्या कवितेचा प्रकृतिधर्मच असा आहे की,
स्वत:शीच हळुवारपणे गुणगुणल्यासारखीच ती व्यक्त होते.
या प्रकृतिधर्माशी सुसंगत अशी सूचकता त्यांच्या कवितेत
अगदी स्वाभाविकपणे आली आहे.
**- मंगेश पाडगावकर**



### दंवभिजली वही

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)



अनिष्ट प्रथा, कर्मठता, शोषण,
अज्ञान अन् दारिद्र्य यांत
पिचत असलेल्या समाजाच्या
प्रगतीसाठी उमटलेला संवेदनशील सूर.

### अजान आणि चालिसा

मुबारक शेख

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)



# आठवणींच्या खिडकीतून

## नाटक : एक अनुभव

पन्नासएक वर्षं होत आली.

नॉर्बर्ट मायर हा एक जर्मन रंगकर्मी. आठवडाभर दररोज चारपाच तास आमची भरत नाट्यमंदिरात कार्यशाळा सुरू होती. अनेक प्रकारचे खेळ आणि व्यायाम... फारच छान दिवस होते ते. शेवटच्या दिवशी बोलता बोलता त्यानं एक हकिकत सांगितली.

जर्मनीतल्या एका माध्यमिक शाळेत स्नेहसंमेलनाची तयारी सुरू होती. सगळे शिक्षक-शिक्षिका आणि मुलंमुली अगदी उत्साहात होते. गाणी, नकला, नाच असे कार्यक्रम ठरत होते. साहजिकच विषय आला नाटकाचा. नाटकात सगळ्यांनाच रस. अगदी मुख्याध्यापिकांनासुद्धा. कोणतं नाटक, कोणकोण कामं करणार, रंगभूषा, वेषभूषा, संगीत, सजावट असे बेत सुरू झाले. असं सुरू असताना काही मुलामुलींनी सुचवलं, की एकेका वर्गाचं नाटक करण्यापेक्षा वर्गातल्या सगळ्यांचं मिळून एक नाटक करावं. मुख्याध्यापिका आणि शिक्षक-शिक्षिका अशा सगळ्यांनाच ती कल्पना आवडली. मग काय? मुलंमुली एकदम खूश! 'ठीक आहे, सगळ्यांचं मिळून एक नाटक करू या, पण नाटकाचा विषय कोणता? आणि कामं करणारे कोण?' - तर मुलं म्हणाली, 'ते सगळं आम्ही सगळे मुलंमुली मिळून ठरवणार आहोत.' शिक्षक-शिक्षिकांना खरं तर जरा हायसंच वाटलं. मुलंमुली नाटकाचं सगळंच आपापसात बघणार आहेत ना! (ब्याद मिटली!) मुख्याध्यापिकांनीही संमती दिली. नाटकाची एकूणएक जबाबदारी तुम्ही सगळे एकत्र बसून ठरवणार, हे ठीक, पण तुम्ही नाटक ठरवत असताना आम्ही काही सूचना तरी करायच्या की नाही? - यावर एकच गिल्ला झाला आणि ठरलं ते असं की शिक्षक-शिक्षकांनी नाटकाच्या बाजूला ढुंकूनसुद्धा पाहायचं नाही. इतकंच नाही, तर दररोजचे वर्गातले तास संपल्यानंतर, नाटक करणारे सगळे, वर्गाचं दारं कडीकुलूप लावून बंद करतील आणि मगच नाटकाची प्रॅक्टिस सुरू होणार.

सगळ्यांनाच ती कल्पना आवडली. विशेषत: गुरुजनांना! म्हणजे आता वर्गातले अभ्यासाचे तास संपले की घरी जायला मोकळे! पोरंपोरी काय नाटक करतील ते करतील! नाटक होईल, तेव्हा आपण फक्त बघायचं.

दुसऱ्याच दिवसापासून नाटकाची प्रॅक्टिस सुरू झाली. मग चर्चा, वादविवाद,

भांडणं वगैरे आलंच! पण हे सगळं कधी? तर सगळे गुरुजन घरी गेल्यावर.

मुलंमुली मन लावून प्रॅक्टिस करीत होती. आपलं नाटक छान चाललं आहे, हे त्यांना हळूहळू कळत होतं. पण अगदीच कसं सगळं मुलांवर सोपवायचं, म्हणून सगळे गुरुजन काही विचारू लागले, तर एकमुखानं एकच उत्तर! ''उत्तम चाललं आहे नाटक, मजा येत्येय...''

पाहतापाहता संमेलनाचा दिवस उजाडला. संमेलन एकूण दोन दिवस होणार. पहिला दिवस गोष्टी, गाणी, नाच, नकला वगैरे आणि दुसऱ्या दिवशी फक्त नाटक. सगळ्यांना काळजी होती ती नाटकाची. '...एकदासुद्धा त्यांची प्रॅक्टिस आपण पाहिलेली नाही; होईल ना सगळं व्यवस्थित? - कोणतं नाटक करताहेत कोणास ठाऊक? होईल तेव्हा खरं!...' - तरीही मुलामुलींना काही मदत वगैरे हवी आहे किंवा काय ते विचारून घेतलं. पण नाटक करणारे अगदी तयार होते. कोणाची कसलीच मदत नको, इतकंच नाही, तर नाटकाच्या वेळी स्टेजवरसुद्धा कोणी यायचं नाही. सगळे स्टेजच्या खाली आपापल्या खुर्च्यांवर बसतील. हां! नाटक संपलं आणि आवडलं की सगळ्यांनी स्टेजवर येऊन हवा तेवढा दंगा करायला हरकत नाही!

शेवटी एकदाचा नाटकाचा दिवस उजाडला! फक्त मुलंमुली स्टेजवर आणि सगळे गुरुजन स्टेजच्या खाली आपापल्या खुर्च्यांवर. त्यांची एकमेकांत चुळबुळ आणि खुसफुस चाललेली. 'कोणतं नाटक करताहेत पोरंपोरी कुणास ठाऊक!..' सगळ्यांचे चेहरे उत्सुक पण ताणलेले. शेवटी नाटकातल्या एका गलेलठ्ठ मुलीनं इशारा दिला आणि नाटक सुरू झालं.

स्टेजवर होती टेबल-खुर्ची. खुर्चीवर होता एक मुलगा. तो मुलगा म्हणजे 'सर'! कपाळावर आठ्या आणि नाकावर चश्मा. समोर बाकांवर दिसत होती काही मुलंमुली. 'सर' वर्गातला एक धडा वाचून दाखवत होते. तो वाचताना 'सर' एक शब्द चुकीचा म्हणताहेत हे एका मुलीच्या लक्षात आलं; तिनं लगेचच ते 'सरां'च्या लक्षात आणून दिलं. तरीही 'सर' तो शब्द तसाच म्हणताहेत हे पाहिल्यावर त्या मुलीनं बॅगमधून शब्दकोश काढला आणि 'सरां'ची चूक त्यांच्या लक्षात आणून दिली. 'सर' गडबडले, तशी काही मुलंमुली हसायला लागली. 'सरां'नी आपला अपमान केला, उद्धटासारखे ते बोलले, असं काहीतरी सांगून 'सरां'नी सगळा धडाच संपल्याचं जाहीर केलं. सगळे अचानक एकमेकांकडे पाहतच राहिले! – आणि तास संपला!

- हा नाटकाचा पहिला प्रवेश.

आता दुसरा प्रवेश.

टेबल-खुर्ची वगैरे तसंच. वर्गातल्या 'बाई' खुर्चीवर येऊन बसलेल्या. 'बाई' एकेकाचा गृहपाठ घेत होत्या. मुलामुलींचा गृहपाठ पाहताना 'बाईं'च्या लक्षात आलं, की एका मुलीनं दुसऱ्या मुलाचा गृहपाठ त्याला जसाचा तसा उतरवून दिला आहे. 'बाई' संतापल्या. मुलाला शिक्षा म्हणून बाईंनी त्याच्या डोक्यावर जोरानं थप्पड

दिली. त्या गडबडीत त्याचा चश्मा खाली पडला आणि फुटला. ...'माझा चश्मा...' असं काहीतरी तो पुटपुटत असताना 'बाईं'नी त्याचा चश्मा त्यांच्या अंगावर भिरकावला आणि पुढच्या गृहपाठाकडे त्या वळल्या.

- हा नाटकाचा दुसरा प्रवेश.

त्यानंतर तिसरा प्रवेश, मग आणखी पुढचा प्रवेश... मग आणखी पुढचा...

आता स्टेजवर खालच्या ओळीतल्या खुर्च्यांमध्ये बसलेल्या 'गुरुजनां'मध्ये कुजबुज सुरू झाली. '....हा माझ्या वर्गातला प्रसंग, तो प्रसंग तिच्या वर्गात घडलेला, आणि तो त्या 'सरां'च्या वर्गातला, अगदी हुबेहूब...'

वर्गातल्या एकामागून एक पाचसहा घटना नाटकात सादर झाल्या आणि पुढचा प्रवेश सुरू झाला तो न्यायालयातला. एक मोठ्ठं टेबल, त्याच्यासमोर न्यायाधीशांचं आसन आणि पुढच्या काही रांगांमध्ये वकील, फिर्यादी, काही नागरिक (सगळे नाटकातले!)

वर्गात घडलेला एकेक प्रसंग घेऊन फिर्यादी, आरोपी, साक्षीदार असे आळीपाळीनं बोलत होते. आसनावर बसलेले न्यायाधीश मधूनमधून टिपणं घेत होते आणि वाटलं तर खुलासा मागत होते, मधूनच काहीतरी विचारत होते. —सगळ्या प्रसंगांबद्दल फिर्यादी, साक्षी, पुरावे वगैरे ऐकून झाल्यानंतर आता 'न्यायाधीश' त्यांचा निवाडा करायला उभे राहिले. प्रत्येक प्रसंगाबद्दल गंभीरपणाने निवाडा सुरू झाला आणि 'न्यायाधीशां'नी निर्णय दिला की घडलेल्या घटना पाहता, सगळ्या प्रकरणांमध्ये सगळे आरोपी दोषी असून त्यांना शिक्षा देण्यात येत आहे..!

'न्यायाधीशां'नी त्यांचा निर्णय जाहीर करताक्षणी नाटकातल्या सगळ्या मुलामुलींनी गुरुजनांच्या दिशेनं तोंडं फिरवली आणि खुर्च्यांवर बसलेल्या त्या सर्व


अपयशाचा धोका पत्करणं हा प्रायोगिकतेतला महत्त्वाचा भाग.
हा धोका पत्करून आपली निसर्गदत्त शक्ती अन् कौशल्य
जिवंत आणि सुस्थितीत राखणारी मुंबईची प्रायोगिक रंगभूमी.
तिच्या तीन दशकांच्या इतिहासाचा दस्तऐवज

प्रायोगिक रंगभूमी : तीन अंक

मुंबईतील प्रायोगिक रंगभूमीचा मौखिक इतिहास

मूळ इंग्रजी ग्रंथाचे संपादन : शांता गोखले

अनुवाद आणि संपादन : माधव वझे

किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ५०)



'गुरुजनां'वर त्यांनी काल्पनिक मशिनगन्स रोखून आपल्या आवाजातच गोळ्यांचा धडाडधुम् असा वर्षाव केला आणि नाटक संपलं!

एव्हाना प्रेक्षागृहातले पालक, मुख्याध्यापिका, शिक्षक-शिक्षिका सगळेच हतबुद्ध झाले होते. मुलं असं काही करतील, यावर कोणाचाच विश्वास बसत नव्हता. सगळा अध्यापकवर्ग एकमेकांशी चर्चा करत असताना मुख्याध्यापिकांनी इशारा देऊन सगळ्यांचं लक्ष वेधलं. जराशी शांतता झाल्यावर त्या म्हणाल्या, ''ही आत्ता बोलण्याची वेळ नाही. आपण सगळे अध्यापक, पालक वगैरे उद्या सकाळी बोलणार आहोत. आपली मुलं अशी का बिथरली, त्याची ताबडतोब चौकशी करण्याची नितांत आवश्यकता आहे आणि त्या दृष्टीनं विचार व प्रत्यक्ष कृती करण्याची गरज आहे. आजपासूनच आपण त्याची सुरुवात करीत आहोत....''

आणि या एका घटनेबरोबर संपूर्ण जर्मनीमधली बाल व कुमार यांची शिक्षणपद्धती आणि रंगभूमी यांमध्ये आमूलाग्र बदल झाला!

***माधव वझे,*** ९६०४८४८०३३

गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच 'दिगमा' या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...

पत्र आणि मैत्र

दिलीप माजगावकर





दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...

वाणी आणि लेखणी

दिलीप माजगावकर

दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट. ख. ₹ १००)

# क...
# कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## रिक्त माझी झोळी

झळकतो ध्रुव आकाशी,
दीपस्तंभ उभे पदोपदी,
पायवाट नित्य वापरातली...

चुके प्रत्येक पाउली ।

प्रेरणांचे झरे शेजारी,
पोवाड्यांचे सुर वातावरणी,
संतांची थोर ग्रंथावली...

अंतरी ज्योत विझलेली ।

सुगंधी वारा भोवताली,
भास्कराची नभी रंगपंचमी
आकाशी ताऱ्यांची रांगोळी...

दृष्टी माझी आंधळी ।

प्रेमाची साथ माउली,
घरट्यावर अदृश्य सावली,
देवत्वाचा वास राउळी...

रिक्त माझी झोळी ।

***अतुल सातभाई***
९८२२० ४९४९३

## वाचन छंद

विपुल वाचन करावे
इतरांसही सांगावे
ज्ञानसंपन्न करावे
आपुले जग ।।

अक्षरे असताती लेणी
वाचूनी साठवावी मनी
योग्य समयी येती कामी
आपुल्याची ।।

वाचन कधी न जाई वाया
वाचावे कोणत्याही समया
करी अद्‌भुताची किमया
वाचनछंद ।।

***विलास वि. फडके***
९४२११ ७०११५

## ‘राजहंसी’ विविधा





भयकंपित करणारे बदल अन् बाजारीकरणातून
निर्माण झालेल्या शोषणाच्या नवनव्या तऱ्हांनी
बरबटलेला जडशीळ भोवताल पेलता पेलता
घायाळ झालेला समकाळ म्हणजे
‘खांदे सुजलेले दिवस’हा कवितासंग्रह.

### खांदे सुजलेले दिवस

अशोक कोतवाल

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

मानवी भावभावनांची आणि पर्यायाने मानवी वर्तनाची
पाळेमुळे मेंदूत असली पाहिजेत,
या विज्ञानाच्या विचारधारेला बळकटी देणारे,
मेंदूविज्ञानाबद्दल कुतूहल जागृत करणारे

### आपले वर्तन ↔ आपला मेंदू

डॉ. आनंद जोशी । सुबोध जावडेकर

किंमत : ₹ ४४०/- । (ट.ख. ₹ ५०)





ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची.
ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी
अपघातानं ती एक चूक करते.
पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं.
यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडतो का?
परतीची वाट सापडते का?

### डोईचा पदर आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

## उद्गार

नियतकालिकांचे/
समाजमाध्यमांचे अभिप्राय

## पाषाणाचे पाझर : स्थापत्य अभियंत्याची कर्तृत्वगाथा

*सतत विकसित होणाऱ्या आणि अगदी कठीण प्रसंगांतसुद्धा आपल्या मनाची ऋजुता जपणाऱ्या गाडगीळांच्या या अतिशय समृद्ध व्यक्तिमत्त्वाच्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या खुणा पुस्तकभर अगदी सहजपणे पसरलेल्या आहेत. त्या वाचकाच्या पदरात भरभरून वाचनानंद टाकतात आणि एक समृद्धानुभवगाथा वाचल्याचा दुर्मीळ असा आनंद देतात.*

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जन्मलेले गणेश नारायण गाडगीळ यांनी 'माझी जीवनगंगा' हे छोटेखानी आत्मकथन लिहिलं होतं. अतिशय सामान्य परिस्थितीत कोकणातल्या लहान गावामध्ये जन्माला आलेल्या गणेश नारायण यांनी शिक्षणाची कास धरली आणि नंतर विद्यादानाचं व्रत आयुष्यभर पाळलं. त्यांचे चिरंजीव डॉ. भास्कर गणेश गाडगीळ हे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जन्माला आले. त्यांनी 'आमच्या वेळी...' असं आत्मकथन लिहिलं. हाच वारसा डॉ. भास्कर गणेश यांचे चिरंजीव विवेक गाडगीळ यांनी चालवला. ते अत्युत्तमरीत्या स्थापत्य अभियंता झाले. अगदी साध्या नोकरीपासून त्यांनी आपल्या आयुष्याला सुरुवात केली आणि नंतरच्या काळात हेवा वाटावा, असं यश मिळवलं. आपल्या क्षेत्रात उदंड कीर्ती मिळवली. भारताच्या अगदी दक्षिण टोकापासून ते पूर्वेकडच्या हल्दियापर्यंत नोकरीनिमित्त ते गेले. विवाह झाल्यानंतर लगेचच त्यांना कामावर, तेसुद्धा दक्षिण भारतातल्या अगदी दूरवरच्या तुतीकोरीन या गावी, हजर व्हायला लागलं. परका, अनोळखी प्रदेश; भाषा माहीत नाही. तिथल्या कुणालाही हिंदी भाषेचा गंध नाही. उलट हिंदीबद्दल सार्वत्रिक द्वेषाचीच भावना. अशा परिस्थितीत विवेक गाडगीळ आपली नवपरिणीत वधू उमा यांच्यासह त्या गावात गेले. तिथं जाताना त्यांना अकल्पितपणे चांगल्या स्वभावाची माणसं भेटत गेली. त्यांच्याकडून मदत मिळाली. ते थूथुकुडी या गावामध्ये काम करू लागले. तिथल्या कामात रमले. आपल्या स्वभावानं विवेक आणि उमा यांनी अनेक माणसं आपलीशी केली. त्या दिवसांचं आणि तिथल्या अनुभवाचं सुरेख वर्णन गाडगीळ यांनी केलं आहे. त्या अनुभवाचा गाडगीळ यांना

नंतरच्या आयुष्यातही खूप उपयोग झाला. पण अनुभवाचं हे संचित गोळा करण्यासाठी त्यांना लग्न झाल्या झाल्याच आपल्या आणि सासुरवाडीच्या घरातल्या सर्वांचाच हिरमोड करून निघायला लागलं होतं. हाती आलेली संधी सोडायची नाही, उलट तिचं सोनं करायचं, असा निश्चय केल्यासारखे गाडगीळ त्या वेळी वागले. त्यासाठी सारे मोह, संकेत त्यांनी निग्रहानं दूर केले. जणू भविष्यात मोठी झेप घेण्याचीच ते सर्वांगीण तयारी करत होते...

अवकाशयानानं आकाशात झेप घेतली, की पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणशक्तीवर मात करून पुढं मुसंडी मारायला खूप शक्ती लागते. पण एकदा का गुरुत्वाकर्षणाची शक्ती भेदली, की ते यान आपल्या वेगानं प्रवास करू लागतं. थूथुकुडीपर्यंतचा प्रवास आणि तिथलं काम हे गाडगीळ यांच्यासाठी अवकाशात झेप घेतलेल्या अवकाशयानासारखं ठरलं.

आई-वडलांच्या प्रेमाचे, घरगुती नात्यांचे, मित्रांच्या ओढीचे बंध त्यांनी निग्रहानं दूर केले. आपलं काम हेच महत्त्वाचं मानलं. आणि मग कामाला प्राधान्य देणं, हाती घेतलेल्या कामात झोकून देणं हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा जणू अविभाज्य असा एक भागच झाला. थूथुकुडीतल्या कामातून शिकायला मिळालेल्या अनेक गोष्टी, बघायला मिळालेले आणि अनुभवाला आलेले माणसांच्या स्वभावाचे अनेक नमुने हे सारं त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला समृद्ध करणारंच ठरलं. तिथून ते एकदम बंगालात गेले आणि मग त्यांना अबुधाबीच्या प्रकल्पावर काम करण्याची संधी मिळाली. 'लार्सन अँड टुब्रो'सारख्या कंपनीमध्ये काम करायला लागण्याचाच तो परिणाम होता. तिथून त्यांच्या व्यावसायिक यशाची कमान सतत उंचावत गेली. त्या प्रकल्पामध्ये काम करताना आपल्याला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या, असं त्यांनीच नमूद केलं आहे. मात्र




पालकांनी मुलांशी संवादासाठी सुरू केलेलं बोलणं
हमखास विसंवादाचं वळण घेतं. हा तिढा सोडवायचा कसा?
प्रक्रिया सोपी नाही, पण प्रयत्नसाध्य नक्की आहे.
त्यासाठी सादर आहे एका बालरोगतज्ज्ञ
समुपदेशिकेचे अनुभवाचे बोल...

प्रिय पालक

अडनिड्या वयातल्या मुलांच्या आईबाबांशी संवाद

डॉ. वैशाली देशमुख

किंमत : ₹ ३२०/- । (ट.ख. ₹ ५०)

अबुधाबीपर्यंतचा आणि त्यानंतरचा प्रवास हा काही एकाएकी झालेला नाही. त्यामागे त्यांनी घरापासून दूर राहून घेतलेल्या महाविद्यालयीन शिक्षणाचा आणि त्यासाठी केलेल्या परिश्रमांचा फार मोठा वाटा आहे. अगदी लहान वयातच ते प्रेमपाशात अडकले. आपण करतो आहोत ते ‘प्रेम’ आहे हे स्पष्टपणे समजण्याचं वय नव्हतं, अशा वयात ते आणि अभ्यासात उत्तम गती असलेली बुद्धिमान लता काटे हे दोघं एकमेकांकडे आकर्षित झाले. अकरावीची परीक्षा झाल्यानंतर लता एक वर्षासाठी अमेरिकेला गेल्या. त्या काळात पत्रांमधून परस्परांच्या मनांतल्या हळुवार भावना एकमेकांना समजल्या. त्या वेळी दोघंही वयानं लहान होते. त्यांची शिक्षणं सुरू होती. शिवाय ‘जात’ हा एक मोठा घटक होताच. डॉ. गाडगीळ आणि डॉ. काटे ही संगमनेरमधली अत्यंत प्रतिष्ठित घरं होती. त्याचंही एक दडपण विवेक आणि लता यांच्या मनावर होतंच. त्या संपूर्ण काळात त्या दोघांनी दाखवलेला संयम, अभ्यासाकडे त्यांनी दिलेलं लक्ष आणि परीक्षांमध्ये मिळविलेलं चांगलं यश हे त्यांच्या भावी आयुष्याची उत्तम पायाभरणी करणारं ठरलं. एका अर्थानं त्या काळात नुकतीच समज येऊ लागलेल्या या दोघांचा मानसिक आणि भावनिक परिपक्वतेकडे प्रवास सुरू झाला. त्याला जोड मिळाली, ती बौद्धिक क्षेत्रातील भरारीची! त्यामुळे त्यांचं प्रेम सफल होण्याच्या दिशेनं धीम्या पण निश्चित अशा दिशेनं वाटचाल करू लागलं.

हा प्रवास विवेक गाडगीळ यांनी फार सुरेखरीत्या रंगविला आहे. अर्थात तसा तो रंगवून सांगणं, हा त्यांचा मुख्य हेतू नाही. प्रमुख उद्देश हा शिक्षणाचा काळ, त्या काळातील वैशिष्ट्यपूर्ण शिक्षक, आपल्याला भेटलेले मित्र, त्यांच्याबरोबरचे हसते-खेळते दिवस, केलेला अभ्यास आणि ज्या काळात ते महाविद्यालयीन शिक्षण घेत होते, त्या काळात घडलेल्या ठळक घटनांची नोंद करणं हा आहे. या साऱ्यातून ते


एक मध्यमवर्गीय मुलगा परिस्थितीशी झगडत
शिकून बांधकाम व्यावसायिक होतो.
खाजगीकरण, उदारीकरण अन् जागतिकीकरण
यांच्यामुळे त्याच्या आयुष्यात होते उलथापालथ.
एका संवेदनशील माणसाच्या
आयुष्याची वेधक कहाणी.

अलवार मनाची हुरहुर

राजीव शास्त्री



किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

तो काळ वाचकासमोर उभा केला. त्यांची निवेदनशैली अतिशय सहज अशी आहे. कोणताही आव न आणता किंवा आपण काहीतरी जगावेगळं सांगत आहोत असा आभास निर्माण न करता ते आता दूरवर गेलेल्या काळाचं, त्यातल्या सहाध्यायींचं, गुरुजनांचं, केलेल्या श्रमांचं, माफक प्रमाणातल्या मौजमजेचं चित्रण करतात. आपले आई-वडील, आपली भावंडं, त्यांचं शिक्षणातलं यश, वडलांचं थोरपण, आईनं सजग मनानं केलेले घट्ट संस्कार, त्यावेळचं संगमनेर, तिथलं वातावरण यांविषयी ते सहजपणे लिहितात. त्यांच्या आठवणींचा प्रवाह इतका जोरकस आहे, की त्यामध्ये आपण कधी आणि कसे अडकलो, हे वाचकाला समजत नाही. हे यश विवेक गाडगीळ यांच्या लेखणीचं आहे. ललितलेखनाचा कोणताही अनुभव नसलेल्या स्थापत्य अभियंत्यानं इतक्या सोपेपणानं आपली जीवनगाथा उलगडून सांगणं, ही खूपच नवलाईची गोष्ट आहे. आयुष्याला हवा तसा आकार देण्याचा सतत प्रयत्न करणाऱ्या, त्यासाठी सतत बौद्धिक कष्ट घेणाऱ्या, सातत्यानं मानसिक, शारीरिक श्रम करणाऱ्या, मनाला आपल्या ताब्यात ठेवण्याचं वळण स्वत:ला लावत जाणाऱ्या, भावनांना कह्यात ठेवण्यास शिकणाऱ्या माणसांच्या आयुष्याचा प्रवाह हा नेहमीच यशाच्या, अधिक यशाच्या दिशेनंच जात असतो. गाडगीळ याला अपवाद नाहीत, हे प्रस्तुतच्या आत्मकथनातून स्पष्ट होतं.

वयाची ६२ वर्षं ओलांडल्यानंतर हैदराबादमधील मेट्रोच्या कामाच्या प्रमुखपदाची जबाबदारी त्यांच्यावर विश्वासानं सोपविण्यात आली. वयाची साठी ओलांडल्यानंतर अशा प्रकारच्या कामासाठी त्यांची निवड होणं, ही गोष्टच त्यांच्याबद्दल बरंच काही सांगून जाणारी आहे. त्याही वेळी त्यांच्या पत्नीनं त्यांना दिलेली साथ ही अमोल आणि हेवा वाटावी अशी आहे. त्या दोघांमधील उत्कट नात्याचं सुरेख पण अतिशय संयत चित्रण हेसुद्धा या आत्मकथनाचं एक वैशिष्ट्य आहे. विवेक गाडगीळ यांना




नोकरी मागणारा नव्हे,
तर अनेकांना नोकरी देणारा
तरुण उद्योजक. विकासाचा वसा घेतलेल्या
हणमंतराव गायकवाडांची अन्
'भारत विकास ग्रुप'ची कहाणी!

असाही एक किमयागार

अंजली ठाकूर

किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ५०)

इराक, नेपाळ अशा देशांतही काम करावं लागलं. इराकमध्ये तर ऐन युद्धाच्या धामधुमीतच ते होते. मृत्यूचं समीप दर्शन त्यांना झालं. पण त्या संपूर्ण काळातही गाडगीळ यांचं वागणं एखाद्या धीरोदात्त नायकासारखंच होतं. ते विविधरंगी अनुभव मुळातूनच वाचण्यासारखे आहेत. नेपाळमधल्या अतिशय दुर्गम अशा भागात त्यांनी काम केलं. ते तर अनेक अर्थांनी 'जगावेगळं' असं होतं. नेपाळमध्ये काम करतानाच त्यांना अनपेक्षितपणे मराठी बोलणाऱ्या एक 'आजीबाई' भेटल्या. अगदी आडवाटेवर असलेल्या, सुस्थितीतील, बाईचा हात फिरला असावा इतकी टापटीप असलेल्या घराजवळ ते गेले; तेव्हा एक प्रौढ स्त्री बांबूच्या भांड्यात काहीतरी निवडत बसली होती. गाडगीळ यांच्याबरोबरच्या अमितनं तिला विचारलं, ''आम्हा दोघांना रात्रीचं जेवण मिळेल का?'' त्या स्त्रीनं तत्काळ नकार दिला, पण नंतर गाडगीळ आणि अमित यांचं बोलणं ऐकून ती स्त्री त्या दोघांजवळ गेली आणि तिनं 'तुमी दोघं पुन्याचं का?' असं विचारलं आणि मग तिनं केलेला पाहुणचार उत्तमच होता. नंतरच्या बोलण्यात मूळच्या सातारकडच्या असणाऱ्या द्रौपदी आणि नेपाळचे जंगबहादूर यांच्या प्रेमाची कहाणी उलगडली. पुढच्या काळात त्या कुटुंबाशी गाडगीळ यांचं एक नातं निर्माण झालं. इतकं, की नेपाळ सोडताना लेखकानं मुद्दाम जाऊन आजीबाईंचा पाहुणचार घेतला, पण नंतर मात्र हे अवचितपणे निर्माण झालेले ऋणानुबंध टिकले नाहीत, याची खंत गाडगीळ व्यक्त करतात. अशा घटनांमधून गाडगीळ यांचं दिसणारं व्यक्तिमत्त्व अतिशय लोभस आहे.

आपल्याला भेटणाऱ्या एखाद्या व्यक्तीचं वर्णन करण्याची गाडगीळ यांची स्वत:ची अशी एक पद्धत आहे. उदाहरणार्थ, सी. पी. सौंदरराजन या आपल्या सहकाऱ्याविषयी ते लिहितात, ' 'सीपीएस' - मेकॅनिकल फोरमन, वय वर्षे ५०च्या आसपास, उंची ५ फूट ४-५ इंच, वर्ण काळ्यातच जमा, गोल चेहरा, बसके नाक, डोळ्यांवर


आधुनिक तंत्रांचं विविध निकषांवर
कठोर परीक्षण करून त्यांची घातकता
दाखवून देणारं हे पुस्तक :
'समुचित' तंत्रांच्या संयमित वापराकडे जाण्याची
आवश्यकता प्रतिपादन करणारं...

तंत्र-मुक्ती

दिलीप कुलकर्णी

किंमत : ₹ ४२५/- । (ट.ख. ₹ ५०)



लाल काड्यांचा चश्मा, डोक्यावरील बहुतेक केसांनी निरोप घेतलेला, काटक व दणकट शरीरयष्टी, कपाळावर विभूतीचे पट्टे व लाल कुंकवाचा टिळा. इंग्रजीचे जुजबी ज्ञान, हिंदीचा खून करून उत्तर भारतीयांची टर उडविण्याची सवय; पण कामात तरबेज व डोकेबाज जुगाडी.' (पान २१२) वाचकाच्या डोळ्यांसमोर ती व्यक्ती उभी राहावी, अशी डोळ्यांसमोर चित्र उभी करणारी वर्णनं पुस्तकात अनेक ठिकाणी आहेत.

गाडगीळ यांना देशविदेशांमध्ये अनेकविध अनुभव सतत येत गेले. कामाच्या निमित्तानं निरनिराळ्या वृत्ती-प्रवृत्तींच्या माणसांशी त्यांचा संबंध येत गेला. जीवनाच्या एकंदर व्यवहारातील अगदी टोकाच्या म्हणता येतील अशा अनेक घटनांना आणि प्रसगांना त्यांना तोंड द्यावं लागलं. राजकारणी, भाई, डॉन यांचे 'रंग' जवळून न्याहाळता आले. सामान्यत: भेटण्याच्या कल्पनेनंसुद्धा भीतीनं हातपाय लटपटायला लागावेत, अशा दादांनाही ते निर्भीडपणं भेटले आणि आपल्या विचारावर, कृतीवर ठाम राहिले. या साऱ्यातून विवेक गाडगीळ यांचं एकंदर व्यक्तिमत्त्व अतिशय 'श्रीमंत' होत गेलं. सतत विकसित होणाऱ्या आणि अगदी कठीण प्रसंगांतसुद्धा आपल्या मनाची ऋजुता जपणाऱ्या गाडगीळांच्या या अतिशय समृद्ध व्यक्तिमत्त्वाच्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या खुणा पुस्तकभर अगदी सहजपणे पसरलेल्या आहेत. त्या वाचकाच्या पदरात भरभरून वाचनानंद टाकतात आणि एक समृद्धानुभवगाथा वाचल्याचा दुर्मीळ असा आनंद देतात. पुस्तकामध्ये असलेली छायाचित्रं एकंदर कथनाची खुमारी वाढविणारी आहेत. लेखकाचं मनोगत (मनातलं पानावर) आणि डॉ. सदानंद बोरसे यांची प्रस्तावना (काळाचे कोलाज) पुस्तकाच्या अंतरंगात शिरण्यासाठी प्रेरणा देणारी आहे.

***श्रीराम शिधये***

(*'ललित'*, मे २०२४मधून साभार)




संगमनेर येथील एक होतकरू तरुण, स्थापत्य अभियंता.
आपल्या अफाट कर्तृत्वाने मानवी अस्तित्वाशी सगळे एकेक कडीने जोडतो, जणू जीवन फुलवणारे...

पाषाणाचे पाझर

स्थापत्य अभियंत्याची कर्तृत्वगाथा

विवेक गाडगीळ

किंमत : ₹ ९५०/- । (ट. ख. ₹ १००)

# राजहंसी पार

काय घडलं
'राजहंसी' नगरीत?

## 'या हृदयीचे त्या हृदयी' नेणारा 'सप्रेम नमस्कार...'



सोनाली कुलकर्णी व कुणाल रेगे

मुंबईतील एनसीपीएचा रस्ता हा तसा मराठी रसिकांच्या फार पायाखालचा नाही. पु. ल. देशपांडे, अशोक रानडे यांच्या देदीप्यमान कारकिर्दीनंतर आता पुन्हा एकदा एनसीपीएतल्या मराठी कार्यक्रमांची संख्या वाढत चालली आहे. यातला अलीकडचा आणि सर्व अंगांनी सुरेख आविष्कार झालेला मराठमोळा कार्यक्रम म्हणजे 'सप्रेम नमस्कार...' हरहुन्नरी संस्कृतीकर्मी कुणाल रेगे हे त्यांच्या 'बोधगया प्रॉडक्शन'तर्फे अलीकडे वेगळ्या धाटणीचे साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रम करीत असतात. त्यातला पहिला 'अटलजी' या चरित्रग्रंथावरील चर्चेच्या निमित्ताने झाला होता. त्याच साखळीतील हा सहावा कार्यक्रम २२ ऑगस्ट रोजी झाला. काही महिन्यांपूर्वी राजहंस प्रकाशनाचे संचालक दिलीप माजगावकर यांच्या लेखनाचे, पत्रांचे, भाषणांचे दोन खंड प्रकाशित झाले. 'वाणी आणि लेखणी' व 'पत्र आणि मैत्र' ही त्यांची नावे. पैकी 'पत्र आणि मैत्र' यातील दिगमांनी लिहिलेली मोजकी पत्रे अभिवाचनाच्या स्वरूपात सादर करावीत, अशी कल्पना कुणाल यांना सुचली. त्यांनी लेखिका आणि चतुरस्र कलावती सोनाली कुलकर्णी यांना साद घातली. त्यांनी होकार दिल्यानंतर हा दोन तासांपेक्षा थोडा अधिक लांबीचा सुरेख कार्यक्रम तयार झाला. त्याचा एनसीपीएत

झालेला हा पहिला प्रयोग. खरेतर, बोधगया अशा एका कार्यक्रमाचा एकच खेळ करते. पण २२ तारखेचा कार्यक्रम इतका रेखीव झाला आणि तो रसिकांनी उचलून धरला की, हा कार्यक्रम संपताच याचा असाच खेळ पुण्यातही करावा, अशी कल्पना पुढे आली. ती या दोन्ही कलावंतांना आवडली. 'सप्रेम नमस्कार'चा पुढचा प्रयोग त्यामुळे लवकरच पुण्यात होण्याची शक्यता आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दोन्ही खंडांच्या संपादक मंडळाचे एक सदस्य सारंग दर्शने यांनी 'एका अर्थाने माजगावकरांच्या आत्मकथनाची उणीव भरून

**आश्चर्याचा सुखद धक्का!**

'सप्रेम नमस्कार'च्या या सादरीकरणाला स्वत: दिलीप माजगावकर हे हजर राहणार नव्हते. मात्र, ऐनवेळी दिलीप माजगावकर, या दोन्ही खंडांच्या संपादक मंडळातील रेखा माजगावकर, या खंडांना देखणे ग्रंथरूप देणारे ज्येष्ठ कलाकार विकास गायतोंडे, ज्येष्ठ कलावंत श्रीराम रानडे, ज्येष्ठ संपादक मुकुंद संगोराम या साऱ्यांनीच या कार्यक्रमाला हजेरी लावली आणि कार्यक्रमाचा सारा नूरच पालटून गेला. त्यांच्यासमोर अभिवाचन किंवा भाषण करण्याचा नवाच हलकासा ताणही आला. मात्र, विकास गायतोंडे यांचे मनोगत आणि माजगावकर यांचे हृदगत या ऐनवेळच्या संवादांनी समारंभाची खुमारी कितीतरी वाढली. आपण या खंडांना ग्रंथरूप देताना कसा व काय विचार केला आणि स्वत: माजगावकरांना शेवटी सगळे काम झाल्यावरच कसे सांगितले, हे गायतोंडे यांनी गप्पा मारत सांगितले. ते सारे काम डॉ. सदानंद बोरसे यांच्या पुढाकाराने झाले होते. माजगावकरांनी अगदी मोजके पण नेमके हृदगत व्यक्त केले. आपली व पत्रलेखनाची मैत्री कशी झाली, याचे दोन प्रसंग त्यांनी सांगितले. त्यातला एक म्हणजे, त्यांच्या मोठ्या भगिनी कुमुद म्हणजे निर्मला पुरंदरे यांनी त्यांना लिहिलेले सहजसुंदर शैलीतले पत्र आणि नंतर एका दु:खाच्या प्रसंगी विजय तेंडुलकर यांनी प्रत्यक्ष भेटायला न येता लिहिलेले आतड्याचे पत्र. कधी कधी प्रत्यक्ष भेटीपेक्षा लेखणीतून उमटणारे शब्द अधिक नेमके, खरे आणि पारदर्शी असतात, अशी तेंडुलकरांची भूमिका असावी. ती माजगावकरांना पटली. यातूनच त्यांना आलेल्या आणि त्यांनी लिहिलेल्या पत्रांचा एक मोठाच खजिना तयार झाला आहे. आपले पत्रलेखन कसे सुरू झाले आणि ते नेमके कशामुळे फुलले; याचे माजगावकर यांनी मोजक्या पण प्रवाही शब्दांत केलेल्या विवेचनामुळे या कार्यक्रमाचा सारा पोतच बदलून गेला आणि तो एका उंचीवर जाऊन विरामला!

काढणारे हे खंड आहेत,' असे म्हटले. याचे कारण, यात दिलीप माजगावकर यांच्या मित्रांशी होणाऱ्या संवादातून माणूस, राजहंस आणि ते स्वत: यांच्या प्रवासाचे अनेक दुवे मिळत राहतात. तेही पत्र किंवा मुलाखत अशा अनौपचारिक व किंचित सैलसर बांधणी असलेल्या माध्यमातून. हे सारे लक्षात घेऊन कुणाल यांनी वीणा गवाणकर, विजय तेंडुलकर, श्री. पु. भागवत, पुष्पा भावे, फादर दिब्रिटो, अशोक जैन आणि अनिल बर्वे यांना लिहिलेली पत्रे निवडली. यातले प्रत्येक नाव हा मराठी साहित्यातला एक वेगळा व दमदार प्रवाह आहे. त्या अर्थाने गेल्या ५० वर्षांचे प्रातिनिधिक चित्रच उभे राहते. सोनाली आणि कुणाल यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी ही पत्रे अतिशय समजून, भावनांचा योग्य परिपोष करीत, अनावश्यक नाट्य न आणता आणि शब्दांचा व त्यातील अवकाशाचा अर्थ श्रोत्यांपर्यंत पोहोचवत सादर केली. दोघांचाही मराठी साहित्याशी असणारा उत्तम परिचय त्यांच्या सादरीकरणातून दिसतच होता. या पत्रांचे एकान्तवाचन करताना येणारा अनुभव या दोन्ही कलावंतांनी श्रवणानुभव देताना अधिक सखोल केला. यातले अनिल बर्वे यांना उद्देशून लिहिलेले पत्र काळीज गलबलवून टाकणारे होते. एकतर एनसीपीएचे प्रायोगिक थिएटर आणि या वाचनाला मागून असणारी हलकीशी पण नेमक्या सुरावटींची लाइव्ह साथ यामुळे या अभिवाचनाची उंची खूपच वाढली.

या सहाही पत्रांची जातकुळी, त्यांचा हेतू, त्यांतील संवादाची शैली किंवा दिलीप माजगावकर यांची भूमिका हे सगळेच वेगवेगळे होते. एखाद्या लेखकाशी सहज संवाद साधता साधता नवे पुस्तक आधी कल्पनेत व नंतर प्रत्यक्षात कसे साकारते, हे वीणा गवाणकरांच्या पत्रातून जाणवते, तर श्रीपुंना लिहिताना माजगावकर त्यांच्या वडीलकी आणि श्रेष्ठत्वाचा मान राखूनही मोकळेपणाने वेगळी मते नोंदवतात. पुष्पा भावे यांच्या पत्रात त्यांच्या लेखनाचा निदान माणूस व राजहंसमधील प्रवास सहज उलगडत जातो. या साऱ्याच पत्रांना खेळीमेळीचे आणि जिव्हाळ्याचे अस्तर आहे. ते या वाचनातून नेमके अभिव्यक्त होत गेले.

या कार्यक्रमाला एनसीपीएच्या संदर्भ विभाग व ग्रंथालयप्रमुख डॉ. सुजाता जाधव तसेच वरिष्ठ अधिकारी सिद्धार्थ देशपांडे यांनी उत्तम सहकार्य केले. 'राजहंस'च्या मुंबई शाखेने या आयोजनात मोलाचा वाटा उचलला. एनसीपीएत दर्जेदार मराठी कार्यक्रम सादर व्हावेत आणि त्यासाठी रसिकांनी हजेरी लावावी, यासाठी या साऱ्यांनी केलेले परिश्रम या कार्यक्रमाने सार्थकी लागले. शेवटपर्यंत थांबून दाद देणारे दर्दी, जाणते रसिक आणि नंतर दोन खंडांचे हे संच विकत घेण्यासाठी वाचकांनी दिलेला प्रतिसाद यामुळे एनसीपीएच्या प्रायोगिक थिएटरचा सारा माहोल मराठमोळा होऊन गेला. उत्तम, बांधेसूद, न रेंगाळणारे आणि भरपूर मजकूर असणारे कार्यक्रम कसे रंगतात, याचा हा वस्तुपाठ ठरला. मुख्य म्हणजे, मराठी साहित्यात असणारे असे अनेक मोती वेचून त्यांचे

असे सर्जनशील माध्यमांतर करणे, ही मराठी साहित्य व्यवहाराला मिळणारी मोठीच ऊर्जा असते. त्यासाठीही, हे दोन्ही कलावंत, एनसीपीए, बोधगया प्रॉडक्शन्स आणि वसंत मोरे प्रतिष्ठान यांना धन्यवाद द्यायला हवेत!

***विनायक पणशीकर***

## पुनश्च हनिमून : प्रकाशन



डावीकडून : अमृता सुभाष, संदेश कुलकर्णी, महेश काळे,
शैलेश शेटे, अमित फाळके

संदेश कुलकर्णी लिखित 'पुनश्च हनिमून' या नाटकाच्या संहितेचे पुस्तक राजहंस प्रकाशनाने नुकतेच प्रकाशित केले.

अमेरिकेतील सॅन होजे इथे 'सनिवेल थिएटर'मध्ये रंगलेल्या 'पुनश्च हनिमून' नाटकाच्या प्रयोगानंतर रंगमंचावरच प्रेक्षकांच्या साक्षीने 'पुनश्च हनिमून' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. सुप्रसिद्ध गायक महेश काळे आणि प्रयोगाचे आयोजक 'फाइव्ह डायमेन्शन्स'चे शैलेश शेटे यांच्या हस्ते प्रकाशन समारंभ पार पडला. याच नाटकाच्या लेखनाला अमेरिकेतील 'महाराष्ट्र फाउंडेशन'तर्फे नाट्यलेखनाचा 'रा. शं. दातार' पुरस्कार मिळाला होता. अमेरिकेमध्येच पुस्तक प्रकाशन झाल्यामुळे एक वर्तुळ पूर्ण झाले.

## श्याम देशपांडे स्मृती ग्रंथसखा पुरस्कार

ग्रंथप्रसार आणि वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी आयुष्यभर कार्यरत राहिलेल्या श्याम देशपांडे यांच्या स्मरणार्थ छत्रपती संभाजीनगर येथील 'संडे क्लब' आणि देशपांडे परिवाराच्या वतीने 'श्याम देशपांडे स्मृती ग्रंथसखा पुरस्कार' दिला जातो. या वर्षी पुणे येथील 'मैत्री प्रकाशना'च्या मोहिनी कारंडे यांना ज्येष्ठ पत्रकार आणि



डावीकडून : शुभांगी देशपांडे, मोहिनी कारंडे, मंगल खिंवसरा

सामाजिक कार्यकर्त्या मंगल खिंवसरा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शुभांगी देशपांडे होत्या. रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

आपल्या भाषणात खिंवसरा यांनी कारंडे यांच्या कामाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, ''प्रकाशनाच्या क्षेत्रात महिला फारशा नाहीत. या क्षेत्रातील आव्हाने वाढत आहेत. अशा व्यवसायाची घरात कोणतीही परंपरा नसलेल्या मोहिनी कारंडे यांनी आजवर जाणीवपूर्वक भूमिका घेत काम केले आहे. वाचकाला हवे असलेले पुस्तक तत्परतेने उपलब्ध करून देण्यासाठी आयुष्यभर कार्यरत राहिलेल्या श्याम देशपांडे यांच्या नावाचा पुरस्कार कारंडे यांना त्यांचे काम पुढे नेण्यासाठी प्रेरणा देत राहील.''

पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपल्या मनोगतात कारंडे म्हणाल्या, ''दैनंदिन जीवनात संवाद फार आवश्यक आहे. पुरस्काराच्या निमित्ताने या शहराशी नाते जुळले. आजवर मला जे रुचले, तेच मी करत आले आहे. महिलांना सर्वत्र संधी मिळावी, अशी भूमिका घेत त्यानुसार वागत आले. या आवडीनिवडीस साथ देणारा जीवनसाथी लाभला, त्याच्या चोखंदळ दृष्टीने काही चांगली पुस्तके वाचकांना देता आली.''

प्रारंभी विद्या गावंडे, माधुरी देशपांडे आणि अर्चना जोशी यांनी स्वागत केले. शाहू पाटोळे यांनी पुरस्कारामागील भूमिका मांडत कारंडे यांचा परिचय करून दिला. राधाकृष्ण मुळी यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले, तर अप्रूप देशपांडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ, न्या. नरेन्द्र चपळगावकर, मराठवाडा साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष कुंडलिकराव अतकरे, मिर्झा अब्दुल कय्युम नदवी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

❖

## 'राजहंसी' विविधा




बाईच्या संघर्षमय जगण्याचं चित्रण
मराठी कादंबरीला नवं नाही. पण बायकांचा समूह
मात्र क्वचितच कोणी रंगवला...
एका लहानशा खेड्यातला बायकांचा समूह ओघवत्या
भाषेत नि चित्रमय शैलीत रंगवणारी कादंबरी...

### बाय गं...

सामान्य स्त्रीचे सामान्य जनजीवन

विद्या पोळ - जगताप

किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

कला, साहित्य आणि समाज यांच्या मूल्यव्यवस्थांमध्ये
प्रचंड उलथापालथ करून टाकणाऱ्या
छोट्या पडद्यामागच्या भयाण वादळाला
चित्रित करणारी कादंबरी...

### ॲट एनी कॉस्ट

अभिराम भडकमकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३२५/- । (ट. ख. ₹ ५०)






हे छोटेखानी लेख म्हणजे जणू सोनचाफ्याची फुलंच.
त्यांचा सुगंध जसा मन मोहरवून टाकतो,
तसे हे लेखही सात्त्विक समाधान देणारे,
चौफेर संचार करणारे, प्रेरणेच्या पणत्या
पेटवणारे आणि भावविश्व समृद्ध करणारेही!

### ओंजळीतील चाफा

स्वानंद मुकुंद कुलकर्णी

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)



# वाचकांच्या मनातलं...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## चंद्रशेखर : जसं जगलो तसं

अंबरीशजी,

'चंद्रशेखर : जसं जगलो तसं' हे आपण अनुवादित केलेलं, चंद्रशेखरांचं आत्मकथन वाचलं. चंद्रशेखरांविषयी महाविद्यालयीन काळापासून मनात थोडं आकर्षण आणि बरचसं औत्सुक्य होतं. त्यामुळे पुस्तक लगेच वाचून झालं.

अनुवाद छानच झालाय. पण खरं सांगू का, अनुवादापेक्षा 'चंद्रशेखर : समंजस आणि संवेदनशील' हे तुमचं प्रास्ताविकच अधिक भावलं आणि अनुवादापेक्षा त्याच्याच प्रेमात पडलो.

त्यात तुम्ही चंद्रशेखरांबरोबर झालेल्या भेटींतून, वार्तालापातून तुम्हाला भावलेले आणि समजलेले चंद्रशेखर छानपैकी उलगडून दाखवलेत. चंद्रशेखरांच्या सर्व पैलूंना सहज स्पर्श केला.

तुमच्या भाषाशैलीविषयी काय बोलणार? छोट्या छोट्या वाक्यांतून आणि आशयगर्भ उपमांतून तुम्ही प्रसंग डोळ्यांसमोर उभे करता.

उदाहरण द्यायचं झालं तर, इंदिरा गांधींच्या हत्येनंतर रिट्झमध्ये तुम्ही चंद्रशेखरना भेटला. निरोप घेताना 'माझी आजी बलियाची' असं तुम्ही म्हणाला. ते ऐकून चंद्रशेखर पाहत राहिले. त्यांच्या अवस्थेचं वर्णन करताना तुम्ही लिहिलं, 'त्यांच्या डोळ्यात मेंदीभरलं आकाश उतरलं.' हे वाक्य वाचलं आणि तुमच्या प्रतिभेला दाद दिली.

दुसरं उदाहरण. संडे ऑब्जर्वरच्या ऑफिसचं वर्णन करताना, 'इमारतींचे जिने लाकडी आणि काळोखात कण्हणारे' असं लिहिलंत. हे वाचल्यानंतर मात्र चक्रावलो. 'काळोखात कण्हणारे जिने' म्हटल्यावर माझ्या डोळ्यांपुढे वेगळ्या 'वस्ती'तील माडीवर जाणारे जिने उभे राहिले. ही उपमा त्या जिन्यांना चपखल लागू होते. या

ठिकाणी ती कोणत्या अर्थाने वापरली ते समजलं नाही. असो.

जयवंत दळवी चंद्रशेखरांच्या पदयात्रेत चार पावलं सहभागी झाले, हे वाचल्यानंतर मन भूतकाळात गेलं. पदयात्रा नाशिकला आली होती. संध्याकाळची वेळ. यात्रा सा.वा.ना.कडून (सार्वजनिक वाचनालय नाशिक) यशवंत व्यायामशाळेच्या चौकात येत होती. आम्ही चौकात दुभाजकाजवळ उभे होते. यात्रेच्या अग्रभागी चंद्रशेखर झपझप चालत येत होते. हात उंच करून लोकांना अभिवादन करत होते. चौकातून डावीकडे मेहेरकडे वळले. हातभर अंतरावरून गेले. त्यांची उंची आणि रांगडेपण डोळ्यांत भरलं. 'देश का नेता कैसा हो?' कुणीतरी आवेशात आरोळी दिली. 'चंद्रशेखर जैसा हो...' उत्स्फूर्तपणे दाद दिली. त्यांच्याबरोबर चालू लागलो. मेहेरपर्यंत पोहोचेपर्यंत चंद्रशेखर केव्हाच पुढे निघून गेले होते.

तुमच्यामुळे ह्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. धन्यवाद.

***डॉ. उमेश करंबेळकर***

## टीव्ही, मालिका आणि बरंच काही...!

मुग्धा गोडबोले ताई,

एक सर्वसामान्य वाचक या नात्याने पत्र लिहीत आहे.

आपण लिहिलेले 'टीव्ही, मालिका आणि बरंच काही...!' हे पुस्तक नुकतेच वाचून संपवले. अतिशय सुरेख जमले आहे.

याआधी संगीतकार सलील कुलकर्णी यांनी 'शकु मेली' अशा शीर्षकाचा विनोदी लेख लिहिला होता. संध्याकाळच्या 'डेली सोप्स'मध्ये प्रेक्षक किती बुडून जातात, हा केंद्रबिंदू ठेवून तो लेख होता. तो सोडला, तर मला नाही वाटत की टीव्ही मालिकांवर कुणी सखोल पुस्तक लिहिले असेल. ते मोलाचे काम तुम्ही केलेत.

टीव्ही मालिकांचा इतिहास, पडद्यामागे निर्माता-लेखक-वाहिनी ते नट-मेकअपमनपर्यंत साऱ्यांचे राबणारे हात, त्यामागची आर्थिक गणिते, कथांची 'गोत्रे', मध्येच मुद्दाम पेरलेली विनोदी पात्रे; हे सारे सांगताना 'स्टोरीटेलिंग' व मांडणी दोन्ही सुरेख जमले आहे. टीव्ही मालिकेत कथा, पटकथा व संवाद यांवर साहजिकच ते तुमचे कार्यक्षेत्र असल्याने 'होमग्राऊंड'वर फलंदाजाने फटकेबाजी करावी, असे आपण विस्ताराने लिहिलेत. खूप सुरेख. शेवटी शेखर ढवळीकर यांनी जो 'मालिकेचा शेवट सांगा' हा किस्सा सांगितला आहे, त्याने डोळे पाणावले.

मी मालिकांचा नियमित प्रेक्षक नाही, लहानपणी 'श्रीयुत गंगाधर टिपरे' ही

मालिका पाहिली होती तेवढा अपवाद. तरी पुस्तक वाचताना हातातून खाली ठेववले नाही, इतके रंजक लेखन झाले आहे.

काही राहिलेल्या गोष्टी जाणवल्या, त्या सांगण्याचे धाडस करतो. रिॲलिटी शोबद्दल काहीच उल्लेख दिसला नाही. अर्थात, तुम्ही मालिकांच्या क्षेत्रात असलात तरी, त्याबाहेरचे रिॲलिटी शोचे जग तुम्ही अधिक जवळून बघत असाल असे आम्हा वाचकांना वाटू शकते.

अजून एक म्हणजे हिंदी, इंग्रजी व बाहेरील जगातील मालिकांचा उल्लेखही पुस्तकात नाही. अर्थात पुस्तकाच्या लांबीचा विचार केल्याने तसे झाले असेल.

मी व्यवसायाने जपानी भाषांतरकार आहे, त्यामुळे अभ्यासाचा भाग म्हणून जपानी सिरीज पाहतो. त्या अकरा भागांत संपतात. 'Can't Write!?: A Life Without Scenario' अशी नेटफ्लिक्स मालिका पाहिली होती. ती आता उपलब्ध नाहीये, पण त्यात एका टीव्ही मालिका लेखकाचे आयुष्य दाखवले होते. नट उपलब्ध नसणे, टीआरपी, निर्मात्यांनी बजेट नाही म्हणून 'प्रॉपर्टी' न दिल्याने कथा बदलणे हे सारे त्यात होते. ते सारे हे पुस्तक वाचताना आठवत होते.

मंगला गोडबोले यांचे लेखन वाचत होतोच, पण तोच आनंद तुमच्या लेखनानेही दिला त्याबद्दल आभार. यापुढेही अजून वाचायला आवडेल.

***हर्षद फडके,*** पुणे

## युद्धानंतर...

तुमचा 'युद्धानंतर...' या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने झालेला पॉडकास्ट ऐकला. हा पॉडकास्ट ऐकण्याआधी मी 'the pianist' सिनेमा बघितला. अंगावर काटा आणणारा, भयाण वास्तवाची जाणीव करून देणारा, विचार करायला लावणारा सिनेमा आहे. तुम्ही हे पुस्तक का लिहिलं असावं आणि पुस्तक लिहिताना तुमच्या मनात काय भावना दाटून आल्या असतील, याचं उत्तर मिळालं.

माझा पूर्ण कवितासंग्रह वाचून झाला नसला; तरी ज्या कविता वाचल्या; त्या वाचल्यावर डोळ्यात पाणी, अंगावर काटा आल्याशिवाय राहत नाही. खरं तर ज्या गोष्टीचा आपण कधी विचार करत नाही, अशा वेगळ्या धाटणीचा विचार करायला लावणारं हे पुस्तक आहे. हे पुस्तक वाचताना मला आपण काहीसं आभासी जगात वावरतो, जगतो की काय असा प्रश्न मनात येऊन अस्वस्थ व्हायला होतं.

***रसिका विप्रदास***

# बाय गं...

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीने तिची भूमिका कशी वठवली पाहिजे, याचे काही संकेत पिढ्यान्‌पिढ्यांच्या संस्कारांतून दृढ झाले आहेत. स्त्रीमुक्ती आणि सबलीकरणाच्या सध्याच्या युगात समाज या संकेतांना मूठमाती देऊ शकलाय का? किमान स्वत: स्त्रिया तरी ह्या जोखडातून मुक्त होण्याइतपत सक्षम झाल्या आहेत का? याचं सूक्ष्म विश्लेषण करणारी कादंबरी म्हणजे विद्या पोळ यांची 'बाय गं...'.

चार पिढ्यांतील स्त्रीपात्रांच्या कथेतून उपरोक्त विषय कसलेही अतिरंजन न करता संवेदनशीलतेने मांडलेला आहे. स्त्री शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणापूर्वीची स्त्रियांची चाकोरीबद्ध असणारी अवस्था त्यांना निदान त्या चाकोरीपुरती तरी सक्षम करत असे. परंतु औपचारिक शिक्षणामुळे ती चाकोरी कथितरीत्या मोडलेल्या परंतु पूर्ण स्वावलंबन प्राप्त न करू शकलेल्या स्त्रियांचे एक प्रकारे झालेले अवमूल्यन लेखिकेने अचूक विशद केले आहे.

उच्चविद्याविभूषित होऊन बुद्धिजीवी अथवा कलाजीवी होण्याची क्षमता प्राप्त केलेल्या स्त्रियांनादेखील पारंपरिक चौकटीतील भूमिका बजावण्याच्या अपेक्षा धुडकावून लावता येत नाहीत, हे तथ्य सतत प्रत्ययास येते. स्वानुभव आणि भोवतालाचे निरीक्षण व त्यावर केलेले सखोल चिंतन यातून विकसित झालेली प्रगल्भ वैचारिक बैठक लेखिकेस अभिप्रेत असणारे संदेश वाचकांपर्यंत पोचविण्यात यशस्वी झाली आहे. कादंबरीत रेखाटलेले प्रसंग आपण पाहिलेले, अनुभवलेले असेच आहेत पण त्यांना असणारे मनो-सामाजिक आयाम समजण्याची दृष्टी आपणांस वाचन करताना लाभते. कादंबरीतील प्रमुख पात्रांमध्ये होणारे संवाद हे निश्चितच वाचनीय, चिंतनीय व नव्याने विचार करायला लावणारे आहेत. 'स्त्रीजन्माचीच कहाणी पण नेहमीच्या अभिनिवेशास फाटा देऊन अनुभवसिद्ध तर्कनिष्ठतेवर आधारित' असं या साहित्यकृतीबद्दल म्हटले तरी वावगे ठरू नये!

कादंबरीतील चार प्रमुख पात्रे ही वेगवेगळ्या स्वभावाची, वेगवेगळी पार्श्वभूमी असणारी असली तरी त्यांच्या चित्रणात साहजिक असणारे वैविध्य जपूनही कथासूत्राचा एकजिनसीपणा अबाधित राखण्याचे शिवधनुष्य लेखिकेने कैक स्वभावाची कैक लेकरे सांभाळणाऱ्या माउलीप्रमाणे लीलया पेलले आहे. तीच बाब संवादांच्या प्रवाहीपणाला कोणताही कृत्रिम बांध आडवा न येण्याची! लेखिका या एकाच व्यक्तीच्या कल्पनाशक्तीतून आकारास आलेले शब्द ह्या वेगवेगळ्या पात्रांनी उच्चारले असले तरी ते त्यांच्या तोंडी चपखलपणे शोभत असल्याने सहजगत्या संवादांचे रूप घेतात आणि हे संवाद कुठेच अस्थानी वाटत नाहीत. भोवतालाची सूक्ष्म चिकित्सा करतानाच भोवतालाचीच देणगी असणारी बोलीभाषा लिखाणाचे

सौष्ठवमूल्य वृद्धिंगत करण्याचे साधन म्हणून खुबीने वापरल्याचे वाचकांच्या नक्कीच ध्यानात येईल आणि या भाषेचा वापर करून पात्रांना आणलेला ठसठशीत जिवंतपणा त्यांच्या मनावर एक अमिट छाप सोडेल हेही तितकेच खरे!

***कौस्तुभ गव्हाणे***

## ओंजळीतील चाफा

श्री. स्वानंद,

तुमच्या ओंजळीतील चाफ्याचा सुगंध मनाच्या गाभाऱ्यात कायमसाठी दरवळत राहील हे नक्की.

संवेदनशील मनात कधी सहज तर कधी प्रसंगोपात आलेले स्फुट विचार आदी विविध माध्यमांतून व्यक्त केल्यावर त्यांना नव्याने, साकल्याने आणि सुसूत्रपणे एकत्र बांधणे हे म्हटले तर मोठे कठीण काम. पण ते साधण्यात तुम्ही नि:संशय यशस्वी झाला आहात. या पुस्तकाचे वाचन हा एक सुखद अनुभव होता. या विचारधारेत न्हाऊन निघालेले मन टवटवीत होण्याची बरीच शक्यता मला तरी दिसते.

रसाळ गद्यलेखन हे सोपे काम नव्हे. ते तुम्ही यशस्वीपणे निभावले, याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन !

***मीरा सहस्त्रबुद्धे,*** कोल्हापूर


**मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांवरील पुस्तकांविषयी**

- अभिषेकी — किंमत : ₹ ५००/-
  शैला मुकुंद
- पुनश्च हनिमून — किंमत : ₹ १७५/-
  संदेश कुलकर्णी
- माझे शाळेतले प्रयोग — किंमत : ₹ २४०/-
  स्मिता गौड

कधी न गळणारा

**‘राजहंसी’ मोहोर**

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,

त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**‘राजहंस ॲप’**

App Store — आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play — ॲन्ड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही ‘राजहंस’ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, बनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अप्रुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.



विद्यार्थी, पालक, सहयोगी शिक्षक आणि या क्षेत्रात
प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे गुंतलेल्या अनेक व्यक्ती यांच्या एकत्रित प्रयत्नांमधून साकारलेले -
प्राथमिक शाळेतील शिक्षिका ते शिक्षणप्रशासनात सहभागी झालेल्या शिक्षणाधिकारी अशा विविध
भूमिकांमधून भरीव योगदान देणाऱ्या हाडाच्या शिक्षणतज्ज्ञाने शब्दबद्ध केलेले -



Registered
Rajhans Granthavedh
(REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO,Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48

## राजहंसी वाचकांच्या प्रतिक्रिया आता व्हिडिओच्या माध्यमातूनही...



नमस्कार, राजहंसचे रसिक वाचक कायमच आम्हाला पुस्तकांबद्दलच्या प्रतिक्रिया पत्र आणि ई-मेल यांद्वारे पाठवत असतात. आता तुम्ही तुमच्या प्रतिक्रिया व्हिडिओच्या माध्यमातून आम्हाला पाठवू शकता.

**अधिक तपशीलासाठी या अंकाचे पान २२ पहा.**

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**